RNI No. - MAHMAR 2023/84526

# विदर्भ प्रजासत्ताक


https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -१८२ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि.१४ ऑगस्ट २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## अंगावर गोळी झेलूनही दहशतवाद्याशी लढले, कॅप्टन शहीद स्वातंत्र्य दिनापूर्वीच भारतमातेने वीर पुत्र गमावला

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४जम्मू काश्मीर**

देशभरात भारताच्या ७८ व्या स्वातंत्र्य दिनाच्या सेलिब्रेशनचा उत्साह दिसत असून सर्वत्र तिरंग्यातील रोषणाई दिसून येत आहे. देशभक्तीची गाणी, तिरंग्यात सजलेली ऐतिहासिक ठिकाणं दिसून येत आहे. सोशल मीडियावरही स्वातंत्र्य दिनाचा उत्साह दिसून येत असतानाच, जम्मू काश्मीरमधून एक दु:खद बातमी समोर आली आहे. जम्मू काश्मीरच्या दोडा येथील पटनीटॉप जंगलात दहशतवाद्यांशी लढताना भारतीय सैन्याच्या कॅप्टनला वीरमरण प्राप्त झाले आहे. सैन्य दलाच्या पथकाने या चकमकीत ४ दहशतवाद्यांचा खात्मा केल्याचीही माहिती आहे. कॅप्टन दीपक हे आपल्या पथकाच्या नेतृत्वात या



दहशतवाद्यांशी लढत असताना दहशतवाद्यांच्या भ्याड हल्ल्यात भारतामातेनं आपला पुत्र गमावला आहे. दहशवाद्यांशी गोळी लागल्यानंतरही कॅप्टन दीपक त्यांचा सामना करत होते.

भारतीय सैन्याचे जवान आणि दहशतवादी यांच्यातील चकमकीत गोळी लागल्यानंतर कॅप्टन दीपक यांना त्यांच्या पथकाने रुग्णालयात दाखल केले. मात्र, उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. पटनीटॉप जंगलातील अकर क्षेत्रातील एका नदीकिनारी लपलेल्या दहशतवाद्यांनी हा भ्याड हल्ला केला. बुधवारी सकाळी एन्काऊंटर करण्यात येत असलेल्या जागेवर आपली शस्त्र टाकून दहशतवाद्यांनी तेथून पळ काढला. घटनास्थळावरुन अमेरिका एम ४ रायफलही जप्त करण्यात आली असून तीन बॅगेतून स्फोटकेही जप्त करण्यात आली होती. दरम्यान, स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वसंध्येला राजधानी दिल्ली दहशवाद्यांच्या घटनांवरुन बैठका सुरू असून गुप्तचर यंत्रणांना अलर्ट राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

गुप्तचर माहितीचा हवाला देऊन एका सूत्रानं सांगितलं की, जम्मू आणि काश्मीरमधील कठुआच्या सीमेवर असलेल्या एका गावात अलीकडेच शस्त्रांसह दोन अज्ञात व्यक्तींच्या हालचाली आढळून आल्या आहेत. ते जवळच्या पठाणकोट शहराकडे जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, १ जून रोजी स्फोटकं/ आयईडीची खेप जम्मू शहराच्या अंतरावर पोहोचली. या स्फोटकांचा वापर आगामी काळात सुरक्षा आस्थापना, कॅम्प, वाहनं किंवा महत्त्वाच्या आस्थापनांना लक्ष्य करण्यासाठी केला जाऊ शकतो.

**दिल्लीत उच्चस्तरीय बैठक, यंत्रणा अलर्ट**

दिल्लीच्या पोलीस मुख्यालयात उच्चस्तरीय बैठक पार पडली . बांगलादेशातील परिस्थिती बघता दिल्ली छठ मध्ये कुठलाही अनुचित प्रकार घडू नये म्हणून बैठकीत चर्चा झाली. यानंतर दिल्ली पोलिसांना अलर्ट राहण्याच्या सूचना देण्यात आल्या. बांगलादेशात सध्या गृहयुद्ध भडकलं आहे. अनेक बांगलादेशी नागरिक भारताच्या हद्दीत येण्याचा प्रयत्न करत आहेत. या पार्श्वभूमीवर भारताच्या स्वातंत्र्यदिनानिमित्त दिल्लीत हायअलर्ट जाहीर करण्यात आला आहे. दिल्लीच्या पोलीस मुख्यालयात उच्चस्तरीय बैठक पार पडली. या बैठकीत स्वातंत्रदिनाच्या पार्श्वभूमीवर बांगलादेशमधील परिस्थिती बघता दिल्ली एनसीआरमध्ये कुठलाही अनुचित प्रकार घडू नये म्हणून बैठकीत चर्चा झाली. यानंतर दिल्ली पोलिसांना अलर्ट मोडवर राहण्याचे आदेश देण्यात आले.

## काँग्रेसचे दोन आमदार शिंदे गटात जाणार?

### हिरामण खोसकर, जितेश अंतापूरकरांनी घेतली मुख्यमंत्र्यांची भेट

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४ मुंबई**

राज्यातील काँग्रेस पक्षाचे दोन आमदार शिवसेना शिंदे गटाच्या वाटेवर असल्याची माहिती समोर आली आहे. काल रात्री (१३ ऑगस्ट) या दोन आमदारांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची वर्षा या निवासस्थानी भेट घेतली.

काँग्रेसचे आमदार हिरामण खोसकर आणि जितेश अंतापूरकर यांनी एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. त्यामुळे काँग्रेसचे हे दोन आमदार पक्षाला रामराम ठोकणार असल्याचं सांगण्यात येत आहे. विधानपरिषदेच्या निवडणूकीत क्रॉस वोटिंग कारवाईच्या आधीच हिरामण खोसकर आणि जितेश अंतापूरकर पक्षाला रामराम ठोकणार असल्याची चर्चा रंगली आहे.

एकनाथ शिंदेंसोबतच्या भेटीवर आमदार जितेश अंतापुरकर यांनी 'एबीपी माझा'शी बोलताना प्रतिक्रिया दिली आहे. मी ई-पिक पाहणी अहवाला संदर्भात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. आमच्याकडे शेतकऱ्यांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. मला मुख्यमंत्री यांनी वेळ




**काँग्रेस हायकमांडच्या रडारवर असलेले ५ संभाव्य आमदार कोण?**

सुलभा खोडके- अमरावती, झिशान सिद्दीकी- वांद्रे पूर्व, हिरामण खोसकर- इगतपुरी (अ.जा), जितेश अंतापूरकर- देगलूर (अ.जा), मोहन हंबर्डे- नांदेड दक्षिण

दिली होती. त्यामुळे मी भेट घेतली. राजकीय चर्चा केली नाही, अशी माहिती जितेश अंतापुरकर यांनी दिली.

**हिरामण खोसकर काय म्हणाले?**

मी काँग्रेससोबत होतो आणि काँग्रेससोबतच राहणार आहे. मला उमेदवारी मिळणार आहे. मी निधीसाठी मुख्यमंत्र्यांची भेट घेतली, असं हिरामण खोसकर यांनी 'एबीपी माझा'सोबत बोलताना सांगितलं.

## महाभ्रष्ट युती सरकारने संपूर्ण महाराष्ट्र गुजरातला गहाण ठेवलाय; नाना पटोले यांची बोचरी टीका

### मीडियामध्ये चर्चा करून आम्हाला मुख्यमंत्री नको

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४ अमरावती**

राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण व त्यांच्या नंतरच्या मुख्यमंत्र्यांच्या अथक प्रयत्नांनी महाराष्ट्र घडला व समृद्ध झाला. परंतु भाजपप्रणित महायुती सरकारने हा समृद्ध महाराष्ट्र गुजरातला गहाण ठेवला आहे. महाराष्ट्रातील शेतकरी, तरुण, गरीब व सर्व जाती धर्माच्या लोकांना न्याय देणे ही काँग्रेसची भूमिका आहे. महाविकास आघाडी म्हणून विधानसभेच्या निवडणुकांना सामोरे जाणार आहोत. निवडणुकीनंतर सर्वसहमतीने मुख्यमंत्री ठरवू. मीडिया मध्ये चर्चा करून आम्हाला मुख्यमंत्री नको . महाराष्ट्राचा स्वाभिमान व महाराष्ट्र वाचविणे ही काँग्रेसची प्राथमिकता आहे, असे काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी म्हटले आहे.

अमरावती येथे प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की,



महाभ्रष्ट युती सरकारने मुंबईसह महाराष्ट्र विकायला काढला आहे. महाराष्ट्र गुजरातला गहाण ठेवला आहे. अदानीला महत्वाच्या जमिनी कवडीमोल भावाने दिल्या जात आहे. फक्त महाराष्ट्रच नाही तर संपूर्ण देशाचाच लिलाव सुरु केला आहे. भाजपा सरकारने दिल्लीतील लाल किल्लाही त्यांच्या बगलबच्च्यांना देऊन टाकला आहे. फक्त शनिवारवाडा आणि आगाखान पॅलेसच नाही तर संपूर्ण महाराष्ट्राचा लिलाव या भ्रष्ट सरकारने काढला आहे, महाराष्ट्राची लूट सुरु आहे असे नाना पटोले म्हणाले.

हिंडनबर्ग अहवाल व सेबी प्रमुखांच्या मुद्द्यावर बोलताना नाना पटोले म्हणाले की, मध्यमवर्गातील लोकही मागील काही वर्षांपासून मोठ्या संख्येने शेअर मार्केटमध्ये पैसे गुंतवत आहेत, पण त्यांचा पैसाही सुरक्षित राहिलेला नाही. सेबीचे अध्यक्ष, अदानी व त्यांच्यामागे पंतप्रधान अशा प्रकारचे चित्र दिसत आहे. ही भ्रष्ट यंत्रणा केंद्र सरकारने निर्माण केली आहे, म्हणून राहुल गांधी यांनी अदानींच्या कंपन्यांमध्ये २० हजार कोटी रुपये कोणाचे आहेत? असा प्रश्न विचारला होता. त्याचे उत्तर नरेंद्र मोदी देऊ शकले नाहीत. सुप्रीम कोर्टानेही सेबीच्या प्रमुखाला, तुम्ही काय झोपले होते का? असा प्रश्न केला होता पण सेबीच्या प्रमुखच यात सामिल आहेत, याचाच अर्थ भ्रष्टाचाराची पाळंमुळं पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या आसपास फिरत आहेत असे पहायला मिळत आहे, असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले.

## महाविकास आघाडीत एमआयएम ची होणार एन्ट्री?; जलील यांची 'इंडिया' आघाडीला थेट ऑफर

**विदर्भ प्रजसत्ताक दि.१४छ.संभाजीनगर**

इंडिया आघाडीसोबत जाण्याची ची इच्छा आहे. तुम्ही आम्हाला घ्यायला तयार असाल तर इतक्या जागा आम्ही ला देऊ शकतो ते सांगावे. तुम्ही उद्या मुंबईत बोलवा. महाराष्ट्राबाबत सर्व निर्णय असदुद्दीन औवेसी यांनी माझ्यावर सोडलेले आहेत. आपण एका बैठकीत सर्व निश्चित करू असं विधान एमआयएमचे माजी खासदार इम्तियाज जलील यांनी केलेले आहे.



माजी खासदार इम्तियाज जलील यांनी आज पत्रकारांशी संवाद साधला. त्यावेळी ते म्हणाले की, मविआ नेत्यांकडून याआधी अनेकदा एमआयएम ही भाजपाची बी टीम असल्याचा आरोप केला जातो. आम्हाला सोबत घेतलं तर तुमचा फायदा होईल नाही घेतले तर एमआयएममुळे फटका बसला असा आरोप करू नका. महाविकास आघाडी एमआयएमला किती जागा सोडणार हे सांगावे. आमची इंडिया आघाडीसोबत येण्याची इच्छा आहे. तुम्ही फक्त आम्हाला किती जागा देणार ते सांगा असं जलील यांनी सांगितले.

तसेच शरद पवार, काँग्रेस आणि नव्यानं सेक्युलर झालेली उद्धव ठाकरेंची सेना यांनी विचार करायला हवा. एमआयएमला मानणाराही एक मोठा वर्ग आहे. आम्हाला जर सोबत घेतले तर तुम्हालाही याचा फायदा होऊ शकतो. तुम्ही आम्हाला जितक्या जागा द्याल तिथे नक्कीच आम्हाला फायदा होणार पण त्याच्या कित्येक पटीने जास्त फायदा तुम्हाला मिळणार आहे याचाही विचार करावा असंही माजी खासदार इम्तियाज जलील यांनी म्हटलं आहे.

## आठवले, कवाडे, गवई हे बाबासाहेबांच्या विचारांचे खरे शिलेदार; राऊतांची प्रकाश आंबेडकरांवर टीका

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४ अकोला**

निष्ठावान शिवसैनिकांसाठी मातेसमान असलेल्या शिवसेना पक्षाला फोडून गद्दारांची सेना स्थापन करणाऱ्या शिंदे यांच्या सेनेला प्रकाश आंबेडकर खरी शिवसेना मानत असतील तर मागील अनेक वर्षांपासून या राज्यात व देशात बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचे काम रामदास आठवले, प्रा.जोगेंद्र कवाडे व राजेंद्र गवई करीत आहेत असं म्हटल्यास वावगे ठरु नये. प्रकाश आंबेडकरांची सतत बदलणारी भूमिका पाहता रामदास आठवले, प्रा.कवाडे, गवई हेच बाबासाहेबांच्या विचारधारेचे खरे शिलेदार असल्याचा टोला शिवसेना नेते तथा खासदार संजय राऊत यांनी लगावला.

विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने उध्दवसेनेच्या वतीने शिव सर्वेक्षण अभियान राबविल्या जात आहे. यापृष्ठभूमिवर शिवसेना नेते खासदार संजय राऊत अकोला शहरात दाखल झाले असता, त्यांनी बुधवारी आयोजित पत्रकार परिषदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह महायुती सरकावर टिकेची तोफ डागली. आम्ही




डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानाला व विचारांना मानतो. लोकसभा निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर आमचे घटक होणार होते. त्यांना अकोला लोकसभा मतदार संघासह एकूण सात जागा दिल्या जाणार होत्या. परंतु आंबेडकर यांनी घुमजाव करत स्वबळाचा नारा दिला. त्यांनी बाबासाहेबांच्या विचारांना छेद देऊन ज्या पक्षांना पडद्याआडून मदत केली, ते बाबासाहेबांना कदापी आवडले नसते. माणसाला ज्ञान असेल तर त्याचा मान राखून बोललं गेले पाहिजे अशा शब्दात खासदार संजय राऊत यांनी प्रकाश आंबेडकर यांच्या विधानाचा समाचार घेतला.

## शिवाजी साटम यांना व्ही शांताराम जीवनगौरव पुरस्कार जाहीर, सांस्कृतिक कार्य मंत्र्यांकडून अभिनंदन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४मुंबई**

सीआयडी मालिकेतून घराघरात पोहोचलेले अभिनेते शिवाजी साटम यांना यंदाचा व्ही शांताराम पुरस्कार जाहीर झाला आहे. महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाच्या वतीने देण्याते येणारे पुरस्कार नुकतेच जाहीर करण्यात आले आहेत. शिवाजी साटम यांना व्ही शांताकाम जीवनगौरव पुरस्कार जाहीर झाला आहे. तर ज्येष्ठ अभिनेत्री आशा पारेख यांना स्व. राज कपूर जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. प्रसिद्ध लेख दिग्पाल लांडेकर यांना व्ही शांताराम विशेष योगदान पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी आज या



पुरस्काराची घोषणा केली. '५८ आणि ५९ व्या महाराष्ट्र राज्य मराठी चित्रपट पुरस्कारांच्या अंतिम फेरीची नामांकने घोषित करतांना मला आनंद होत आहे. या सर्व पुरस्कार प्राप्त कलाकारांचे हार्दिक अभिनंदन.!! राज्याचा सांस्कृतिक गौरव आपण सतत उंचावत राहावा आणि आई भवानीने तुम्हा सर्वांना उत्तम आरोग्य व उदंड यश द्यावे या शुभेच्छा.' असं त्यांनी ट्विट करत लिहिले.

## शेख हसीना यांच्या अडचणीत वाढ, वकिलाचं अपहरण केल्याप्रकरणी गुन्हा दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४ नवी दिल्ली**

गेल्या काही दिवसांपूर्वी बांगलादेशात शेख हसीना यांच्या सरकारविरोधात जनतेनं उठाव केला होता. यानंतर परिस्थिती इतकी चिघळली की, शेख हसीना यांना पंतप्रधान पदाचा राजीनामा देऊन देश सोडावा लागला. यानंतरही येथील परिस्थिती अद्याप नियंत्रणाबाहेर आहे. दरम्यान, बांगलादेशात शेख हसीना यांच्या अडचणी वाढताना दिसत आहेत.



२०१५ मध्ये एका वकिलाचे अपहरण आणि जबरदस्तीनं बेपत्ता केल्याबद्दल शेख हसीना आणि त्यांच्या मंत्रिमंडळातील माजी मंत्र्यांसह इतरांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बांगलादेशात शेख हसीना यांच्यावर दाखल झालेला हा दुसरा गुन्हा आहे. डेली स्टार वृत्तपत्रानं दिलेल्या वृत्तानुसार, जबरदस्तीनं बेपत्ता केल्याप्रकरणी पीडित सर्वोच्च न्यायालयाचे वकील सोहेल राणा या प्रकरणी अर्ज दाखल केला आहे. यापूर्वी मंगळवारी माजी पंतप्रधान शेख हसीना आणि इतर सहा जणांविरुद्ध अबू सईद नावाच्या किराणा दुकानदाराच्या हत्येप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता.

## मुख्यमंत्री केजरीवाल यांना सर्वोच्च न्यायालयाकडून दिलासा नाहीच; पुढील सुनावणी २३ ऑगस्टला

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४नवी दिल्ली**

दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना पुन्हा एकदा सर्वोच्च न्यायालयाकडून



दिलासा मिळालेला नाही. न्यायालयाने त्यांच्या जामीन अर्जावर विचार करण्यास नकार दिला आहे. त्यांच्या जामीन अर्जावर न्यायालयात सुनावणी झाली. दरम्यान,त्यांनी सीबीआयच्या अटकेला आव्हान दिले असून त्यावर सर्वोच्च न्यायालयाने केंद्रीय तपास यंत्रणेला नोटीस बजावून उत्तर मागितले आहे. सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणाची पुढील सुनावणी २३ ऑगस्ट रोजी ठेवली आहे.

मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या वतीने ज्येष्ठ वकील अभिषेक मनु सिंघवी यांनी सर्वोच्च न्यायालयात बाजू मांडली. सिंघवी म्हणाले की, केजरीवाल यांना ईडीच्या प्रकरणात अंतरिम जामीन मंजूर करण्यात आला आहे. प्रकृतीचे कारण सांगून त्यांनी तात्काळ अंतरिम जामीन देण्याची मागणी केली, जी सर्वोच्च न्यायालयाने नाकारली. यावेळी आपण अंतरिम जामिनाचा विचार करणार नसल्याचे न्यायमूर्ती सूर्यकांत यांनी सांगितले.

## सहानुभूतीचा विषय संपला, दिल्लीत गेले तरी काँग्रेस 'ती' मागणी कधीच मान्य करणार नाही

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४मुंबई**


मुख्यमंत्रिपदाबाबत दिल्लीत जाऊन शिक्कामोर्तब करून घ्यावं याची गरज का वाटली?. लोकसभेत उद्धव ठाकरेंच्या पक्षाची समाधानकारक कामगिरी नव्हती. त्यांचेही समाधान झाले नसेल. त्यांच्या चूका काय झाल्या याचे आत्मपरिक्षण केले पाहिजे. जर आम्हाला विचारलं तर आम्ही सांगू. उमेदवारी निवडीबाबत काय चूका झाल्या वैगेरे. त्यामुळे पुन्हा सावरण्यासाठी ते दिल्लीत गेले होते का, मला आश्चर्य वाटलं. कारण ती जे मागणी करतायेत ती होणार नाही असं सांगत काँग्रेस नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी उद्धव ठाकरेंच्या चेहरा मविआकडून मुख्यमंत्रिपदासाठी पुढे आणण्यावर स्पष्ट मत व्यक्त केले.

पृथ्वीराज चव्हाण म्हणाले की, जेव्हा आपण विरोधी पक्ष म्हणून निवडणुकीला सामोरे जातो तेव्हा काँग्रेसनं महाराष्ट्रच नाही तर इतर ठिकाणीही मुख्यमंत्रिपदाचा चेहरा दिलेला नाही. ही परंपरा नाही. मुख्यमंत्री जर स्वत: निवडणुकीत उतरले तर सामान्यत: त्यांच्या नेतृत्वात निवडणूक लढली जाते. मग अशोक गहलोत, कमलनाथ होते तेव्हा झाले. पण विरोधी पक्षात असताना अपवाद वगळता चेहरा दिला नाही ही परंपरा आहे.

## सॅल्यूट ! जीवाची बाजी लावून नक्षल्यांशी लढले, राष्ट्रपती पदकाने आयुष्याचे सोने झाले

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४गडचिरोली :**

अतिशय खडतर परिस्थितीत जीवाची बाजी लावून नक्षल्यांशी दोन हात करत शौर्य गाजविणाऱ्या १७ पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांना राष्ट्रपतींचे शौर्य पदक जाहीर झाले आहे, तर एका पोलिस अधिकाऱ्याला गुणवत्तापूर्ण सेवेसाठी पदक घोषित झाले. स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला ही आनंदवार्ता आली. त्यामुळे जिल्हा पोलिस दलाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा



तुरा रोवला गेला आहे.

गडचिरोलीत अपर पोलिस अधीक्षक म्हणून सेवा बजावलेले व सध्या वाशिमचे पोलिस अधीक्षक असलेले अनुज तारे, उपअधीक्षक डॉ. कुणाल सोनवणे, सहायक निरीक्षक राहुल देव्हडे, उपनिरीक्षक दीपक औटे, विजय सपकाळ, हवालदार महेश मिच्चा, कोतला कोरामी, नागेशकुमार मादरबोईना, समय्या आसम, महादेव वानखेडे, विवेक नरोटे, मोरेश्वर पोटावी, अंमलदार कोरके वेलादी, कैलास कुळमेथे, शकील शेख, विश्वनाथ पेंदाम यांना राष्ट्रपतींचे पोलिस शौर्य पदक मिळाले असून, उपनिरीक्षक मधुकर नैताम यांना राष्ट्रपती यांचे गुणवत्तापूर्ण सेवेसाठी पदक मिळाले आहे. शहीद उपनिरीक्षक धनाजी होनमाने यांना मरणोत्तर शौर्य पदक जाहीर झाले आहे.

संपादकीय ......

# हिंडेनबर्गचा अहवाल विरोधकांच्या पिपाण्या

हिंडेनबर्ग अहवालात अदानी यांच्या समूहाचा संबंध असल्याच्या आरोपांनी पुन्हा खळबळ निर्माण झाली आहे. हिंडेनबर्ग यांच्या दाव्यानंतर त्यांच्या अहवालात गेल्या दोन वर्षांपूर्वीही असाच आरोप केला होता आणि त्यानंतर अदानी समूहाचे शेअर्स कोसळले होते. सेबीच्या अध्यक्षा माधवी बूच यांनी हिंडेनबर्गचे आरोप फेटाळून लावले आहेत आणि त्याचवेळी हे आरोप म्हणजे निराधार आणि चारित्र्यहिनाचा प्रयास असल्याचे म्हटले आहे. हे आरोप म्हणजे कोणत्याही सच्चाईपासून अलिप्त असल्याचे त्यांनी म्हटले आहे. वास्तवात हिंडेनबर्गचा आरोप होता की, बूच आणि त्यांचे पती धवल बूच यांचा अदानी मनी सायफनिंग घोटाळ्यात वापरला गेलेला पैशाचा म्हणजे ऑफशोअर हिस्सेदारीत सहभाग होता. बूच पती-पत्नींनी म्हटले आहे की, आमच्यावर केले गेलेले आरोप हे निराधार तर आहेतच, पण आमचे आतापर्यंतचे पुस्तक हे उघड्या पुस्तकासारखे आहे. आम्हाला कोणतीही वित्तीय कागदपत्रे दाखवण्यात कसलीही अडचण नाही. इतका सुस्पष्ट खुलासा केल्यानंतरही हिंडेनबर्ग यांच्या आरोपांचा आधार घेऊन भारतातील विरोधी पक्ष या विषयावर बवाल माजवत आहेत याचे कारण सुस्पष्ट आहे. ते म्हणजे हिंडेनबर्ग यांच्या आरोपांचा आधार घेऊन त्यांना पंतप्रधान मोदी आणि अदानी यांना लक्ष्य करायचे आहे.

गेल्या १०ऑगस्टला हिंडेनबर्ग यांच्याकडून आरोप केला गेला की, माधवी बूच यांनी अदानी सायफनिंग स्कँडलमध्ये वापरल्या गेलेल्या पैशात हिस्सेदारी होती. अदानी यांच्याशी संबंध असल्यामुळे सेबी या प्रकरणी काहीही कारवाई करण्यास तयार नव्हता. पण हे झाले आरोप-प्रत्यारोपांचे. पण भारताचे यात नुकसान झाले आहे ते अभूतपूर्व आहे. हिंडेनबर्ग कायम भारताविरोधात आणि विशेषतः मोदी सरकारविरोधात आरोप करण्यात पुढे असतो. कारण उघड आहे, ते म्हणजे त्यांना कोणत्याही परिस्थितीत मोदी सरकारला बदनाम करायचे आहे. त्यामुळे मोदी यांना बदनाम करून कशी तरी त्यांची प्रतिमा खराब करायची हा देशातील विरोधी पक्षांचा प्रबळ असा अजेंडा आहे. पण देशातील जनता सूज्ञ आहे आणि ती अशा गैरप्रकार करणाऱ्यांच्या धोक्यात येणार नाही, असा विश्वास आहे. आता हिंडेनबर्ग या शॉर्ट सेलर कंपनीने आपल्या तोफा पुन्हा अदानी आणि त्याद्वारे मोदी यांच्याविरोधात डागण्यास सुरुवात केली आहे. यावेळी त्याचे लक्ष्य सेबीच्या अध्यक्षा माधवी बूच आहेत. बूच दांपत्यांवर केलेला आरोप हा भडकवणारा आणि दिशाभूल करणारा आहे.

गेल्या जानेवारीत सर्वोच्च न्यायालयाने सेबी या प्रकरणाची व्यापक आणि सर्वसमावेशक चौकशी करत आहे आणि त्यांच्या चौकशीतून जे सत्य येईल ते योग्य असेल असा निर्वाळा दिला होता. पण तरीही आताही या प्रकरणी पुन्हा वेगळी जेपीसी नेमण्याची मागणी करणे हे विरोधकांच्या षडयंत्राचा वास येणारे आहे. त्याच वेळेस सर्वोच्च न्यायालयाने असेही स्पष्ट केले होते की, विशेष चौकशी पथकाकडे या प्रकरणाची चौकशी देण्याची काहीच गरज नाही. तरीही भारतातील विरोधक या प्रकरणाचे भांडवल करून मोदी सरकारविरोधात मुद्दा उपस्थित करण्यासाठी त्याची ढाल म्हणून उपयोग करत आहेत. हे त्यांच्या क्षुद्रपणाचे निदर्शक आहे. हिंडेनबर्ग यांनी आरोप केला आहे की, बूच दांपत्यांनी आपल्याकडील कथित हिस्सेदारीच्या रकमेचा विनियोग करून, त्याचा उपयोग करून अदानी समूहात पैशाची हेराफेरी केली. पण या आरोप-प्रत्यारोपांमध्ये भारतातील विरोधी पक्षांची गोची झाली आहे. कारण त्यांना हे नक्की काय प्रकरण आहे तेच समजत नाही. त्यामुळे त्यांना नेहमीप्रमाणे मोदी यांना शिव्या घालायच्या पण त्या कशामुळे हे समजत नाही. बूच दांपत्यांचा आरोप खरा आहे की, सेबीच्या विश्वासार्हतेवरच हिंडेनबर्ग आरोप करत आहे. त्याविरोधात सर्व पक्षांनी एकत्र येऊन लढा द्यायला हवा, पण विरोधी मात्र मोदी यांच्या द्वेषाने पछाडले आहेत, त्यामुळे ते एक होऊ शकत नाहीत. खरी गोष्ट अशी आहे की, जितके मोठे उद्योग समूह तितके त्यातील घोटाळे मोठे असे चित्र देशात तयार झाले आहे. हिंडेनबर्ग त्याला अपवाद नाही. एकीकडे सचोटीने उद्योग करून देशाला अभिमान वाटावा अशी कामगिरी करणारे काही उद्योग समूह देशात असताना अल्पावधीत पुढे जाण्यासाठी काहीही मार्ग वापरणारे उद्योग समूह आहेत. त्यापैकीच एक आहे हिंडेनबर्ग.

हिंडेनबर्गने यावेळी थेट सेबीमध्ये व्हिसलब्लोअर असलेल्या सेबीवर हल्ला बोल केला आहे. हे निश्चितच भारतासाठी वाईट आणि खेदजनक आहे. माधवी बूच यांनी अदानी समूहावर कारवाई केली नाही कारण त्यांचे त्यात हितसंबंध दडले आहेत, असा आरोप हिंडेनबर्ग यांचा आहे. बूच यांनी तो फेटाळला आहे हे खरे आहे. मागेही अदानी समूहावर हिंडेनबर्गने आरोप केले तेव्हा त्या उद्योगाचे शेअर्स कोसळले होते आणि त्यांचा एक व्यवहार झाला नव्हता. पण आताही तसेच करायचे हिंडेनबर्गच्या मनात होते. पण तसे काही यंदा होणार नाही. या प्रकरणाची चौकशी झाली मात्र पुढे काहीच निष्पन्न झाले नाही. तेव्हा केवळ प्रसिद्धी मिळवण्यासाठी मोठे उद्योग समूह असा गैरप्रकार करतात हे समोर आले होते. तेव्हा काहीच झाले नाही म्हणून हा दुसरा धक्का देण्यात आला असावा असे मानण्यास जागा आहे. कारण यंदा विरोधी पक्षांची स्थिती पूर्वीपेक्षा जास्त प्रबळ आहे आणि काँग्रेस आता जवळपास शंभर लोकसभेच्या जागा घेऊन आहेत. त्यामुळे राहुल गांधी आणि विरोधी पक्ष हे ताकदवान झाल्याचे समजत आहेत. पण त्यांनी कितीही ताकदवान झाल्याच्या गमजा केल्या तरीही विरोधी पक्षांना हिंडेनबर्गचा भस्मासूर गिळंकृत केल्याशिवाय राहणार नाही. यात खरे म्हणजे पहिल्या वेळेसच परिस्थिती सरकारने समोर आणून खरे काय ते लोकांसमोर ठेवले असते, तर हे सारेच प्रकरण पुढे टाळता आले असते.

# डाळिंब मर रोग नियंत्रणासाठी 'या' तीन पद्धती फायदेशीर



**दि.१४ विदर्भ प्रजासत्ताक** – डाळिंब बागेमध्ये सिरॅटोसिस्टिस, फ्युर्जेरिअम व फायटोप्थोरा या बुरशी आणि सूत्रकृमी, वाळवी, शॉट होल बोरर या किडींमुळे मर रोगाचा प्रादुर्भाव दिसून येतो. या बुरशी व किडींच्या नियंत्रणासाठी फळांच्या काढणीनंतर झाडे ताणावर असताना किंवा बहराच्या सुरुवातीच्या टप्प्यात खालीलपैकी एका पर्यायाने ड्रेंचिंग करावे.

**पहिली पद्धत**

पहिली ड्रेंचिंग प्रोपीकोनॅझोल (२५ ईसी) २ मि.लि. अधिक क्लोरपायरीफॉस २ मि.लि प्रति लिटर पाणी या प्रमाणे १० लिटर द्रावण प्रति झाड.

दुसरी ड्रेंचिंग (पहिल्या ड्रेंचिंगनंतर ३० दिवसांनी) ॲस्परजिलस नायजर (एएन-२७) ५ ग्रॅम अधिक शेणखत २ किलो प्रति झाड तिसरी ड्रेंचिंग (दुसऱ्या ड्रेंचिंगनंतर ३० दिवसांनी) व्हॅम (व्हेसिक्युलर आर्बस्क्युलर मायकोरायझा रायझोफॅगस इरेग्यूलॅरिस / ग्लोमस इंट्राडॅलिसिस) २५ ग्रॅम अधिक शेणखत २ किलो .

**दुसरी पद्धत**

प्रोपिकोनॅझोल (२५ ईसी) २ मि.लि अधिक क्लोरपायरीफॉस २ मि.लि प्रति लिटर पाणी याप्रमाणे २० दिवसांच्या अंतराने तीनवेळा ड्रेंचिंग करावे.

**तिसरी पद्धत**

पहिली व तिसरी ड्रेचिंग – फोसेटील एएल (८० डब्ल्यूपी) ६ ग्रॅम प्रति १० लिटर द्रावण प्रति झाड दुसरी व चौथी ड्रेंचिंग टेब्यूकोनॅझोल (२५९ ईसी) ३ मि.लि प्रति १० लिटर द्रावण प्रति झाड दोन डेचिगमध्ये २० दिवसांचे अंतर ठेवावे.

**संकलन** : कृषि सल्ला ग्रामिण कृषि मौसम सेवा, ए.एम.एफ.यु., इगतपुरी, विभागीय कृषी संशोधन केंद्र, इगतपुरी, जि. नाशिक.

# इयत्ता दहावी व बारावीच्या परीक्षांचा कालावधी जाहीर

**secretary.stateboardgmail.com संकेतस्थळ उपलब्ध**

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४अमरावती–** फेब्रुवारी व मार्च २०२४ मध्ये महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने पुणे, नागपूर, औरंगाबाद, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या विभागीय मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इयत्ता बारावी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.दहावी) च्या लेखी परीक्षांचा कालावधी शिक्षण मंडळाद्वारे जाहीर करण्यात आला आहे. तपशील पुढीलप्रमाणे.

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (सर्वसाधारण व व्दिलक्षी विषय) व उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रमाची लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा मंगळवार, दि. ११ फेब्रुवारी ते मंगळवार, दि. १८ मार्च २०२५ दरम्यान होणार आहे. तसेच माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा शुक्रवार दि. २१ फेब्रुवारी ते सोमवार दि. १७ मार्च २०२५ दरम्यान होणार आहे. तसेच इयत्ता बारावीची प्रात्यक्षिक श्रेणी, तोडी परीक्षा, अंतर्गत मूल्यमापन परीक्षा दि. २४ जानेवारी २०२५ ते दि. १० फेब्रुवारी २०२५ दरम्यान होणार आहे. इयत्ता दहावीची प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी परीक्षा व अंतर्गत मूल्यमापन परीक्षा दि. ३ फेब्रुवारी २०२५ ते २० फेब्रुवारी २०२५ दरम्यान होणार आहे.

उपरोक्त कालावधीमध्ये आयोजित केलेले दिनांकनिहाय काही सूचना, हरकती असल्या त्या मंडळाच्या अधिकृत secretary.stateboardgmail.com संकेतस्थळावर दि. २३ ऑगस्ट २०२४ पर्यंत या संकेतस्थळावर पाठवात्यात. या तारखेनंतर प्राप्त होणाऱ्या सूचनांवर विचार केला जाणार नाही.

शाळा/कनिष्ठ महाविद्यालय व विद्यार्थी यांना अभ्यासक्रमाचे नियोजन करण्याचे हेतूने तसेच विद्यार्थ्यांच्या मनावरील ताण कमी होण्याचे दृष्टीने फेब्रुवारी-मार्च २०२५ च्या लेखी परीक्षेचे संभाव्य वेळापत्रक जाहीर करण्यात आलेले आहे. इयत्ता बारावी व इयत्ता दहावीच्या परीक्षा प्रचलित पध्दतीनुसार आयोजित करण्यात येतील याची सर्व कनिष्ठ महाविद्यालये व माध्यमिक शाळा, विद्यार्थी, शिक्षक, पालक व संबंधीत घटकांनी नोंद घ्यावी, असे आवाहन शिक्षण मंडळाद्वारे करण्यात आले आहे.

त्यानंतर अनुत्तीर्ण तसेच श्रेणीसुधार अंतर्गत प्रविष्ट विद्यार्थ्यांसाठी जुलै-ऑगस्टची पुरवणी परीक्षा साधारणत: जुलैच्या तिसऱ्या आठवड्यापासून घेतली जाते.प्रात्यक्षिक परीक्षा, श्रेणी, तोंडी परीक्षा व अन्य विषयांचे वेळापत्रक स्वतंत्रपणे परीक्षेपूर्वी मंडळामार्फत शाळा/कनिष्ठ महाविद्यालय यांना कळविण्यात येईल.सदर वेळापत्रकां बाबत काही सूचना, हरकती असल्यास त्या विभागीय मंडळाकडे तसेच राज्य मंडळाकडे १५ दिवसाच्या आत लेखी स्वरूपात पाठवाव्यात. तद्नंतर प्राप्त होणाऱ्या सूचनांवर विचार केला जाणार नाही, असे राज्यमंडळ पुण्याच्या सचिव अनुराधा ओक यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे.

# सुरूवातीच्या अवस्थेतच कपाशीवरील मावा, तुडतुडे आणि फुलकिडींचे करा व्यवस्थापन

**दि.१४विदर्भ प्रजासत्ताक**

कापूस पिकावर सुरवातीच्या काळात प्रामुख्याने मावा, तुडतुडे आणि फुलकिडे या रसशोषक किडीचा प्रादूर्भाव आढळून येतो. कोरडवाहू कापूस पिकावर मावा या किडीचा प्रादूर्भाव जुलैच्या दूसऱ्या आठवड्यापासून आढळून येतो.

तर तूडतुड्यांचा प्रादूर्भाव जूलैच्या शेवटच्या आठवड्यापासून व फुलकीडच्यांचा ऑगस्टच्या पहिला आठवड्यापासून आढळून येतो. सुरुवातीपासुनच या किडींचे व्यवस्थापन केल्यास हे नुकसान बऱ्याच प्रमाणात कमी करता येते. त्यासाठी खालील उपाययोजनाचा अवलंब करावा.

एकात्मिक व्यवस्थापन

बीटी कपाशीच्या बियाण्याला इमिडाक्लोप्रीड किंवा थायमिथोक्झाम किटकनाशकांची बीजप्रक्रीया केलेली असते. त्यामुळे रस शोषक किडींपासून सर्वसाधारण २ ते ३ आठवड्यापर्यंत पिकाला संरक्षण मिळते म्हणून या काळात किटकनाशकांची फवारणी करू नये.

वेळोवेळी प्रादूर्भावग्रस्त फांद्या, पाने व इतर पालापाचोळा जमा करून किडींसहीत नष्ट करावा. पिकामधे उगवणीनंतर आठ ते दहा दिवसानंतर २५ पिवळे चिकट सापळे प्रती हेक्टर लावून नियमित पांढरी माशीच्या प्रादुर्भावर लक्ष ठेवावे.

कपाशीत चवळीचे आंतर पीक घ्यावे त्यामुळे चवळी पीकावर कपाशीवरील किडींच्या नैसर्गिक शत्रू किटकांचे पोषण होईल.

वेळेवर आंतरमशागत करून पीक तणविरहीत ठेवावे त्यामुळे किडींच्या पर्यायी खाद्य तणांचा नाश होईल. तसेच बांधावरील किडींच्या पर्यायी खाद्य तणे जसे अंबाडी, रानभेंडी इ. नष्ट करावी. मृद परीक्षणाच्या आधारावर खतमात्रेचा अवलंब करावा आणि जास्तीचा नत्र खताचा वापर टाळावा जेणेकरून कपाशीची अनावश्यक कायीक वाढ होणार नाही आणि पीक दाटणार नाही पर्यायाने अशा पीकावर किडही कमी प्रमाणात राहील.




रस शोषक किडीवर उपजीविका करणारे नैसर्गिक किटक उदा. सीरफीड माशी, कातीन, ढालकिडे, क्रायसोपा इत्यादी परोपजीवी किटकांची संख्या पूरेशी आढळून आल्यास रासायनिक किटकनाशकांचा वापर टाळावा.रस शोषक किडींसाठी कपाशी पिकाचे प्रादूर्भावाबाबत सर्वेक्षण करावे.सरासरी संख्या १० मावा/पान किंवा २ ते ३ तूडतूडे/पान किंवा दहा फूलकीडे/पान किंवा मावा, तुडतुडे आणि फुलकिडे यांची एकत्रित सरासरी संख्या दहा/पान किंवा त्यापेक्षा जास्त आढळून आल्यास नियंत्रणासाठी रासायनिक किटकनाशकाचा वापर करावा. त्यासाठी बुप्रोफेझीन २५ टक्के प्रवाही २० मि.ली., किंवा फिप्रोनील ५ टक्के प्रवाही ३० मि.ली., किंवा इमिडाक्लोप्रिड १७.८ टक्के २.५ मि.ली. यापैकी कोणत्याही एका किटकनाशकाची १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

# अमरावती शहरातील लालखडी व सुफीयान नगर येथे रास्त भाव दुकान

## संस्थांनी अर्ज करण्याचे पुरवठा अधिकाऱ्यांचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४अमरावती–** अमरावती शहरातील लालखडी व सुफीयान नगर या दोन शहरामध्ये नवीन रास्त भाव दुकाने सुरू करण्याबाबत जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला आहे. नवीन रास्त भाव दुकानांसाठी इच्छुक संस्था व गटांनी २ सप्टेंबरपूर्वी अर्ज सादर करावे, असे आवाहन जिल्हा पुरवठा अधिकारी निनाद लांडे यांनी केले आहे.निवडीचा प्राथम्यक्रम: नवीन रास्तभाव दुकानांसाठी संस्थेची निवड करताना पंचायत ग्रामपंचायत व तत्सम स्थानिक स्वराज्य संस्था, नोंदणीकृत स्वयंसहायता बचत गट, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० अंतर्गत नोंदणीकृत सहकारी संस्था, संस्था नोंदणी अधिनियमांतर्गत नोंदणी झालेल्या सार्वजनिक संस्था किंवा न्यास यांना अर्ज करता येईल. याच



प्राथम्यक्रमानुसार रास्तभाव दुकान परवाने मंजूर केलेल्या दुकानांचे व्यवस्थापन महिला किंवा त्यांच्या समुदयाव्दारे करणे आवश्यक राहिल.

अर्जाची प्रक्रिया: इच्छुक संस्था, गटांना विहित नमुन्यातील अर्ज संबंधित तहसिल कार्यालयात कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी ११ ते सायंकाळी ६ वाजेदरम्यान प्राप्त होऊन दाखल करता येतील. अर्जाची विक्री व स्वीकृत करण्याची मुदत दि. २ सप्टेंबरपर्यंत राहील. त्यानंतर प्राप्त अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. रास्त भाव दुकानाचा परवाना मंजूर करण्याची कार्यवाही जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समिती करेल. रास्त भाव दुकानाचे अर्ज १०० रूपये चलानाव्दारे लेखाशीर्ष ४४०८ व्दारे भरणा करून संबंधित तहसिल कार्यालयामधून प्राप्त करून घेता येईल, असे जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी कळविले आहे.

# उच्च व तंत्र शिक्षण मंत्री तथा अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत (दादा) पाटील यांचा अमरावती दौरा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१४अमरावती–** राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्ये मंत्री तथा अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत (दादा) पाटील यांचा दि. १४, १५ व १६ ऑगस्ट २०२४ रोजीचा अमरावती दौरा पुढीलप्रमाणे:

बुधवार, दि. १४ ऑगस्ट रोजी नागपूर येथून रात्री ९ वाजता शासकीय विश्रामगृह, अमरावती येथे आगमन व मुक्काम. गुरूवार, दि. १५ ऑगस्ट रोजी सकाळी ८.५५ वाजता शासकीय विश्रामगृह, अमरावती येथून वाहनाने विभागीय आयुक्त कार्यालयाकडे प्रयाण. सकाळी ९.०५ वाजता विभागीय कार्यालय येथे आगमन व भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजारोहण समारंभास उपस्थिती. सकाळी ११ वाजता प्रेमकिशोर सिकची चॅरिटेबल ट्रस्ट, वलगाव येथे आगमन व सन २०२४-२५ राजभाजी महोत्सव समारंभास उपस्थिती. दुपारी १२.१० वाजता वलगाव येथून वाहनाने कुरलपुर्णा, ता. चांदूरबाजारकडे प्रयाण. दुपारी १ वाजता सत्यशोधक बहुउद्देशिय शिक्षण संस्था, निवासी मूकबधीर विद्यालय टोंगलापूर फाटा मासोद, पो. कुरलपूर्णा, ता. चांदुरबाजार येथे आगमन व आमदार बच्चू कडू यांची सदिच्छा भेट. दुपारी ४.३० वाजता आमझरी पर्यटन संकुल, आमझरी ता. चिखलदरा येथे भेट व साहसी खेळ चालविणाऱ्या युवक-युवतींशी चर्चा. सायंकाळी ५.३० वाजता प्रकाश होम स्टे, खटकाली, ता. चिखलदरा येथे आगमन व सदिच्छा भेट. सोयीनुसार शासकीय विश्रामगृह, चिखलदरा येथे आगमन, राखीव व मुक्काम.



शुक्रवार दि. १६ ऑगस्ट रोजी सकाळी ८.५० वाजता शासकीय विश्रामगृह, चिखलदरा येथून वाहनाने कार्यक्रम स्थळाकडे प्रयाण. सकाळी ९ वाजता चिखलदरा, कुंभी बल्ला, भिमकुंड येथे आगमन व गावीलगड वन्यजीव परिक्षेत्रातील निसर्गानुभव मचाणीचे उद्घाटन व लोकार्पण सोहळ्यास उपस्थिती. सकाळी १० वाजता भिमकुंड येथील साहसी खेळ प्रकल्पाचे उद्घाटन व लोकार्पण सोहळ्यास उपस्थिती. सोयीनुसार चिखलदरा येथून वाहनाने अमरावतीकडे प्रयाण. शासकीय विश्रामगृह अमरावती येथे आगमन व राखीव. दुपारी ३ वाजता जिल्हा क्रीडा संकुल, अमरावती येथे जिल्हा क्रीडा संकुल लोकार्पण व विविध क्रीडा सुविधा भुमिपूजन समारंभास उपस्थिती. सोयीनुसार शासकीय विश्रामगृह अमरावती येथे आगमन व राखीव. सायंकाळी ५ वाजता शासकीय विश्रामगृह, अमरावती येथून वाहनाने नागपूरकडे प्रयाण.

RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

# विदर्भ प्रजासत्ताक

बुधवार दि. १४ ऑगस्ट २०२४

शहर/ग्रामिण


# उद्या साजरा होणाऱ्या स्वातंत्र्य दिनानिमित्त तिरंगा ध्वज , ब्रेसलेट, स्टिकर सह विविध वस्तूंनी सजली बाजारपेठ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४ अमरावती**

स्वातंत्र्य दिनानिमित्त तिरंगी झेंडे आणि देशभक्तिपर विविध वस्तू बाजारात विक्रीस आल्या असून, आहेत. शहरातील ठिकठिकाणी या वस्तूंची दुकाने लागल्याचे दिसून येत आहे. अवघ्या दोन दिवसांवर आलेल्या १५ ऑगस्ट अर्थात स्वातंत्र्य दिनानिमित्त चिमुकल्यांसह नागरिकांमध्ये उत्साह दिसून येत आहे. वाहन, घरांवर लावण्यासाठी तिरंगी झेंडे यासह देशभक्तीपर संदेश देणारे बॅच, स्टिकर, टॅटू, ब्रेसलेट, अंगठी, तिरंगी, फुगे आशा विविध वस्तूंनी बाजारपेठ सजली आहे. राजकमल चौक, गांधी चौक, मोची गल्ली, जयस्तंभ, श्याम चौक, गाडगे महाराज समाधी मंदिर परिसरासह विविध ठिकाणी अशा वस्तू खरेदी विक्रीचे दुकाने



लागले आहेत. दुकानांवर विक्रीस असलेले तिरंगी झेंडे वाऱ्याने फडकत आहेत. नागरिकांनी वस्तू खरेदीसाठी मंगळवारी बाजारपेठेत गर्दी केली होती. महागाईमुळे सर्वच वस्तूंच्या किमतीमध्ये सुमारे २० ते २५ टक्के वाढ झाली आहे. तिरंगा झेंड्यांना अधिक मागणी असल्याचे विक्रे त्यांनी सांगितले.

स्वातंत्र्य दिनासाठी विविध संस्था, शासकीय कार्यालये, शाळा, महाविद्यालये प्रामुख्याने राष्ट्रध्वजाची खरेदी करत असतात. त्यासाठी बाजारपेठेत गर्दी होत आहे. विशेषत: राष्ट्र ध्वज खरेदीला पसंती दिली जात आहे. मागणीनुसार विविध आकारांमध्ये हे ध्वज उपलब्ध आहेत. यंदाच्या बाजारपेठेतील प्रमुख आकर्षण म्हणजे पोशाखावर लावले जाणारे छोटे झेंडे, लहान आकारातील कागदी, कापडी व मेटलचे झेंडे उपलब्ध झाले आहेत. त्यालाच ग्राहकांची मोठी पसंती आहे. विविध आकारातील झेंड्यांना मोठी मागणी आहे, तर दरवर्षी पोशाखावर लावणाऱ्या कापडी व मेटलच्या झेंड्यांना पसंती मिळत आहे.

पथकांची संचलनाची तयारी जोरात स्वातंत्र्य दिनासाठी शाळेची स्वच्छता, वर्गांची सजावट, विविध साहित्यांची दुरुस्ती, विविध पथकांची संचलनाची तयारी अशा प्रकारे संपूर्ण परिसरात प्रसन्न वातावरण असते. विद्यार्थ्यांबरोबरच शिक्षकही तेवढ्याच उत्साहाने या सर्वांमध्ये समाविष्ट होत असतात. स्वातंत्र्य दिनाच्या दिवशी विविध शाळांमधून काढल्या जाणाऱ्या प्रभात फेरीचे सर्वांनाच विशेष आकर्षण असते. पारंपरिक वेशभूषेत लेझीम, ढोल ताशांसह विद्यार्थी यामध्ये सहभागी होत असतात.

# आदिवासी विकास विभागातून 'प्रतिनियुक्ती'चे अतिक्रमण हटवा

## राजपत्रित अधिकारी संघटना आक्रमक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती–** राज्याच्या आदिवासी विकास विभागात इतर विभागातून अधिकाऱ्यांना प्रतिनियुक्ती देण्याचे प्रमाण वाढले आहे. हा मुळात आदिवासी विकास विभागावर अन्याय असून हे 'प्रतिनियुक्ती'चे अतिक्रमण हटवून संबंधित अधिकाऱ्यांना कार्यमुक्त करावे आणि अशा नियुक्त्या यापुढे देऊ नयेत, अशी आक्रमक भूमिका राजपत्रित अधिकारी संघटनांनी घेतली आहे.

आदिवासी विकास विभाग अधिनस्थ राजपत्रित अधिकारी संघटनांनी १२ ऑगस्ट रोजी आदिवासी विकासमंत्री डॉ. विजय गावित यांच्यासह आयुक्त, सचिवांना पाठविलेल्या निवेदनातून 'ट्रायबल' अधिकाऱ्यांची व्यथा मांडली आहे. आदिवासी विकास विभागात वर्ग १ व २ च्या विविध पदांवर सक्षम अधिकारी कार्यरत इतर विभागातून 'प्रतिनियुक्ती'वर अधिकारी पाठविले जातात. यात अपर आयुक्त मुख्यालय आदिवासी विकास आयुक्तालय, नाशिक, पुणे येथील आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था सहसंचालक, अहमदनगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यातील राजूर येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी, पुणे येथील आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था अधिव्याख्याता या महत्त्वाच्या पदावर 'ट्रायबल' अधिकारी न्याय देऊ शकतील, असे सक्षम अधिकारी आहेत. मात्र सेवाप्रवेश नियमावली डावलून तसेच प्रतिनियुक्तीचे अधिकारी कनिष्ठतम दर्जाचे असताना मूळ पद अवनत करून प्रतिनियुक्तीचे अतिक्रमण वाढीस लागले आहे. ११ संवेदनशील प्रकल्पात भारतीय प्रशासकीय सेवा अथवा वन सेवेतील अधिकारी उपलब्ध न झाल्यास इतर विभागातील अधिकाऱ्यांची बदलीने नियुक्ती करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हा प्रकार शासन निर्णयाला बगल देणारा ठरत आहे. त्यामुळे आदिवासी विकास विभागाचा मूळ उद्देश आणि विकासाचा पाया भक्कम करता यावा, यासाठी इतर विभागातील अधिकाऱ्यांची बदलीने नियुक्ती करू नये, असे राजपत्रित अधिकाऱ्यांनी निवेदनातून कैफियत मांडली आहे. तसेच प्रतिनियुक्तीवर असलेल्या अधिकाऱ्यांना मुदतवाढ देण्यात येऊ नये, अन्यथा बेमुदत सामूहिक रजा आंदोलनात सहभाग घेतला जाईल, अशी मागणी निवेदनातून अमरावतीचे अपर आयुक्त सुरेश वानखेडे, उपायुक्त जागृती कुमरे, सहआयुक्त ममता विधळे, सहायक आयुक्त शिवानंद पेढेकर यांच्यासह राज्यातील राजपत्रित वर्ग १ व २ च्या अधिकाऱ्यांनी केली आहे.

# मध्यवर्ती कारागृहात बंदीजन साकारत आहे गणरायांच्या मूर्ती

## उडाण विकास केंद्र येथे गणेशमूर्ती विक्रीसाठी होणार उपलब्ध

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४ अमरावती–** हातून कळत न कळत झालेल्या चुकांचे प्रायश्चित पाषाण भिंतीआड शिक्षेच्या रूपात भोगत असलेले बंदीजन गणरायांच्या मूर्ती साकारत आहेत.ज्या हाताला कधीकाळी व्यवस्थेने गुन्हेगारी ठरविले, आता तेच हात देवांच्या मूर्ती तयार करीत असल्यामुळे हे कैद्यांच्या आयुष्यात मोठे सकारात्मक बदल मानले जात आहे.

गणरायांच्या मूर्ती विक्रीतून बंदीजनांना रोजगार उपलब्ध होणार आहे. कारागृहाची दिनचर्या सूर्योदय ते सूर्यास्त अशी आहे. त्यामुळे कैद्यांनी कधी काय करावे याचे दैनंदिन नियोजन ठरले आहे.अमरावती मध्यवर्ती कारागृहात आजमितीला १२८७ कैदी बंदिस्त आहेत. यात खून, दरोडे, बलात्कार, नक्षलवादी यासह गंभीर गुन्ह्यांतील कैद्यांचा समावेश आहे. मात्र, कारागृह प्रशासनाकडूनकैद्यांना सुधारणा व पुनर्वसनअंतर्गत कुशल, अकुशल व अर्धकुशल या स्वरूपाची कामे करावी लागतात. ज्या कैद्यांकडे जे कौशल्य असेल, तशी कामे त्यांच्याकडून प्रशासन करून घेतात. त्याअनुषंगाने ७ सप्टेंबर रोजी गणेश उत्सव येणार असल्यामुळे तो 'कॅश' करण्यासाठी कारागृह



### उडाण' येथे मूर्तींची विक्री

चांदूर रेल्वे मार्गालगत उडाण विकास केंद्र येथे गणेशमूर्ती विक्रीसाठी असणार आहेत. भाविकभक्तांनी गणरायांच्या मूर्ती खरेदी कराव्यात, असे आवाहन येथील मध्यवर्ती कारागृहाच्या अधीक्षक कीर्ती चिंतामणी यांनी केले आहे.

प्रशासनाने कैदी बांधवांच्या हातून गणरायांच्या मूर्ती साकारण्याचे कार्य हाती घेतले आहे. त्याकरिता ८ ते १० बंदीजनांना मूर्ती साकारण्याचे प्रशिक्षणदेखील देण्यात आले आहे. शाडू मातीच्या आणि सुबक अशा गणरायांच्या मूर्ती कैदी तयार करीत आहेत. या गणेश मूर्ती बघितल्या तर परंपरागत कलावंत अथवा मूर्तिकरांनाही लाजवेल, अशी कलाकुसर कैद्यांच्या हातून साकारली जात आहे. त्या मुर्ती विकत घेऊन कैद्यांच्या हाताला रोजगार मिळवून देण्याच्या प्रयत्नांना मदत करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# संजय राऊत कधी महानगरपालिकेची किंवा ग्रामपंचायतीची निवडणूक तरी लढले आहेत का?

## आ. रवी राणांचा संजय राऊतांवर घणाघात



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती–** यंदाच्या निवडणुकीत भरभरुन आशीर्वाद न दिल्यास लाडकी बहीण योजनेचे पैसे परत घेईन, असं विधान बडनेराचे आमदार रवी राणा यांनी केले होतं. या विधानावरून आज संजय राऊत यांनी रवी राणा यांच्यावर सडकून टीका केली होती. रवी राणा आगामी विधानसभा निवडणुकीत पराभूत होतील, असेही ते म्हणाले होते. दरम्यान, या टीकेला आता रवी राणा यांनी प्रत्युत्तर दिलं आहे. अमरावतीत माध्यमांशी बोलताना त्यांनी यासंदर्भात प्रतिक्रिया दिली.

मी अमरावती जिल्ह्याचा सुपूत्र आहे. एक मराठी माणूस म्हणून मी महाराष्ट्रावर प्रेम करतो. मात्र, माझा संजय राऊतांना प्रश्न आहे, ते कधी ग्रामपंचायतीची किंवा महानगरपालिकेची निवडणूक तरी लढले आहेत का? राज्यसभेच्या निवडणुकीतही ते अर्धा मताने जिंकून आले. आजपर्यंत लोकांमध्ये जाऊन ते कोणतीही निवडणूक लढले नाहीत. पण ते दुसऱ्यांना पाडण्याच्या गोष्टी करतात, असं प्रत्युत्तर त्यांनी संजय राऊत यांना दिलं. पुढे बोलताना, संजय राऊतांमध्ये हिंमत असेल तर त्यांनी माझ्याविरोधात निवडणूक लढवून दाखवावी,त्यांचं डिपॉझिट जप्त झाल्याशिवाय राहणार नाही, असं आव्हानही त्यांनी दिलं.संजय राऊत हे कधीही लोकांमधून निवडून आलेले नाहीत. त्यामुळे त्यांना आमच्यावर टीका करण्याचा अधिकार नाही. संजय राऊत फक्त सिल्वर ओक आणि १० जनपथवर जाऊन लोटांगण घालू शकतात किंवा मातोश्रीची चौकीदारी करू शकतात. जनतेच्या हिताचं एकही काम त्यांनी आजपर्यंत केलेलं नाही, अशी टीकाही रवी राणा यांनी संजय राऊत यांच्यावर केली.

# बिच्छन नदीपात्रात भूमाफियांचे अतिक्रमण

## नदीचा मार्ग वळविण्याचे प्रयत्न



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अचलपूर–** परतवाडा शहरातून वाहणार्या बिच्छन नदीच्या काठावरील भाग, शेती भूमाफिया खरेदी करून नदीच्या मूळ प्रवाहाला वळती करीत त्या ठिकाणी नदीलगतच्या भागात तात्पुरत्या स्वरूपाचे अतिक्रमण करून जागा हडपण्याचा प्रयत्न करीत असल्याचा गंभीर प्रकार परतवाडा शहरात सुरू आहे.एकीकडे देशात व राज्यात नदी जोड प्रकल्पाला चालना मिळत असताना परतवाडा शहरातून वाहणार्या बिच्छन नदीच्या पात्रात वाढते अतिक्रमण पर्यावरणाच्या दृष्टीने अत्यंत घातक ठरत आहे. मेळघाटातून बिच्छन नदी उगम पावत परतवाडा व अचलपूर शहरातून पुढे वाहत जाते. परतवाडा शहरात जवळपास ७ किलोमीटर भागातून ही नदी वाहते. परंतु वर्षानुवर्षे नदीकाठाच्या भागात मोठ्या प्रमाणात अतिक्रमण होत आहे. नदीचा प्रवाह देखील विटामातीची भरती टाकून दुसरीकडे वळवण्यात आला आहे. दोन्ही काठावरील अतिक्रमणधारकांनी वेळोवेळी नदीपात्रात भरती टाकत ज्या ठिकाणी आपली घरे, व्यावसायिक दुकाने थाटले आहे, तेथून नदीचा प्रवाह वळविला आहे. याचा पर्यावरणावर विपरित परिणाम होऊन नदीला आलेल्या पुराचे पाणी अनेकदा नागरिकांच्या घरात देखील घुसले आहे. छोटा बाजार, कालीमाता झोपडपट्टी परिसर, लाल पूल, सफेद पूल आदी भागात बरेचदा पुराचे पाणी घुसलेले आहे.जमिनीचे भाव परतवाडा शहरात सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर असताना नदीकाठ्याच्या भागातील जमीन व्यापारी वर्ग विकत घेऊन त्या ठिकाणी अतिक्रमण करीत असल्याचे अनेकदा निर्देशनास आले आहे. असाच प्रकार सैतुक बाग कॉलनी परिसर, रेल्वे पूल या भागात झाला असून काही लोकांनी अतिक्रमण केल्याची तक्रार तहसीलदार व उपविभागीय अधिकारी यांच्याकडे शेतकर्यांनी दिली होती. त्यांचा नेहमीचा रस्ता जेसीबीच्या साह्याने बंद करून त्या भागातून नदीचे पाणी वाळविण्याची तक्रार काही शेतकर्यांनी दिली होती.

# हतरू गावात अतिसाराची लागण

## मेळघाटात साथीच्या आजाराचे थैमान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४ मेळघाट–** मेळघाटात गावागावात अतिसाराची लागण सुरूच आहे. आता तालुक्यातील हतरू या दुर्गम भागातील गावात साथ रोगाची लागण झाली आहे. या गावाची लोकसंख्या ९७८ आहे. या ठिकाणी रात्रीपासून अतिसाराची लागण झाली.



असून अनेक रुग्ण या ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी येत आहेत. काही रुग्ण ग्रामीण रुग्णालय चुरणी तसेच उपजिल्हा रुग्णालय अचलपूर येथे पाठवण्यात आले असल्याची माहिती आरोग्य प्रशासनामार्फत देण्यात आली आहे. उर्वरित रुग्णांवर प्राथमिक आरोग्य केंद्र हतरु येथे उपचार सुरू असल्याची माहिती आरोग्य विभागामार्फत देण्यात आली आहे.

हतरू या गावातील ३० ते ३५ लोकांना ही लागण झाली आहे. या सर्वांवर उपचार करण्यात आले असून गंभीर रुग्णांना ग्रामीण रुग्णालय चुरणी येथे तर अति गंभीर रुग्णांना अचलपूर उपजिल्हा रुग्णालय येथे पाठविण्यात आले आहे. चुरणी ग्रामीण रुग्णालयात सोनाली भुसुम१९वर्षे, सुशील बेठेकर ७ वर्षे, फुलमा भुसुम ४५ वर्षे, सुधाकर ठाकरे २५ वर्षे, तर अचलपूरच्या रुग्णालयात झानकु सेलुकर ५०वर्षे, दिव्या ठाकरे १३वर्षे आदी रुग्णांना रेफर करण्यात आले आहे.सध्या सर्व रुग्णांची प्रकृती स्थिर आहे.

### हातपंपातील पाण्यामुळे लागण

हातपंपातील दूषित पाण्यामुळे गावातील ३० ते ३५ लोकांना ही लागण झाली आहे. पैकी नऊ लोकांना आम्ही ग्रामीण रुग्णालय चुरणी व उपजिल्हा रुग्णालय अचलपूर येथे रेफर केले आहे. ते हात पंप सील करण्यात आले आहे तसेच उर्वरित पाण्याच्या स्त्रोतांचे क्लोरीफिकेशन केले आहे. गावातील नागरिकांना पाणी उकळून व गाळून प्यावे, अशा सूचना देण्यात आल्या असल्याची हतरू केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. रवींद्र चव्हाण यांनी दिली.




# शिवाजी महाविद्यालयाची ऐतिहासिक उड्डाण:

# एनआयआरएफ रँकिंगमध्ये देशातील सर्वोत्तम १०० मध्ये स्थान

## उत्तरोत्तर प्रगती साधत देशभरातून ९९ व्या क्रमांकावर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती**

देशभरातील शैक्षणिक संस्थाचे मानांकन करणाऱ्या नॅशनल इन्स्टिट्यूशनल रँकिंग फ्रेमवर्क (एनआयआरएफ) प्रक्रियेत पहिल्या १०० सर्वोत्तम महाविद्यालयांची घोषणा केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने नुकतीच केली. या मध्ये श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावतीने, देशातील सर्वोत्कृष्ट १०० महाविद्यालयांच्या यादीत स्थान पटकावून अमरावती शहराला गौरान्वित केले आहे. दरवर्षी अखिल भारतीय स्तरावर देशभरातील महाविद्यालयांच्या मूल्यमापनानंतर गुणवत्तेवर आधारित रँकिंग घोषित केल्या जात असते. दिनांक १२ ऑगष्ट रोजी जाहीर यादीत टॉप १०० महाविद्यालयांच्या इलाईट ग्रुप मध्ये आपले स्थान निश्चित केले.

नॅक मानांकनात ए प्लस दर्जा दर्जा प्राप्त करून श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावतीने आपले वैशिष्ट्यपूर्ण अस्तित्व सिद्ध केलेलेच होते. त्यातच या सत्रापासून विद्यार्थ्यांना विशेषानुभव देण्यासाठी दोन महत्वाकांक्षी योजना कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये केंद्र शासनाच्या शिक्षण मंत्रालयाच्या प्रधान मंत्री उच्चस्तर शिक्षा अभियान आणि विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयाच्या डिपार्टमेंट ऑफ बायोटेक्नॉलॉजी द्वारा देशभरातील निवडक महाविद्यालयांना देण्यात येणारे स्टार कॉलेज योजनेतील स्ट्रेंगदनिंग कंपोनंट यांचा समावेश आहे. सोबतच राजीव गांधी सायन्स अंड टेक्लॉनोजी कमिशनच्या टेक्लॉनोजी लॅब साठी अर्थसहाय्य देखील प्राप्त झाले आहे. देशभरातील प्रथम १०० महाविद्यालयांच्या यादीत समाविष्ट होऊन महाविद्यालयाच्या प्रगतीचा पुन्हा एक नवा टप्पा पार पडला आहे.

संपूर्ण शिवपरीवारासाठी ही अभिमानास्पद आणि उल्लेखनीय उपलब्धी असून, महाविद्यालयाच्या देशपातळीवर कार्यगौरवाची मान्यता आहे. अध्ययन, अध्यापन, आणि मूल्यांकन प्रक्रियेतील उत्कृष्टता, संशोधन कार्यातील प्रगती, विद्यार्थ्यांच्या उल्लेखनीय यश, विस्तार कार्यक्रमांची प्रभावी पोहोच, शिक्षण क्षेत्रातील तज्ञांचे सकारात्मक अभिप्राय, आणि नवसंकल्पनांवर आधारित उपक्रमांमुळेच महाविद्यालय देशातील प्रथम शंभर महाविद्यालयांमध्ये स्थान मिळवू शकले आहे.संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातून एकमेव महाविद्यालयाने यादीत आपले स्थान प्राप्त केले आहे. या अभूतपूर्व यशाच्या निमित्त श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे सन्माननीय अध्यक्ष श्री हर्षवर्धनजी देशमुख यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी. व्ही. कोरपे आणि सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. त्यांनी महाविद्यालयाचा लौकिक देशपातळीवर मान्यता पावल्याबद्दल आणि हि उपलब्धी महाविद्यालयाच्या प्रत्येक घटकाच्या समर्पित कार्यामुळे प्राप्त झाल्याचा गौरव व्यक्त केला.

महाविद्यालयाच्या एकूण कार्यप्रणालीचा आणि सर्व घटकांच्या समर्पित कार्याचा हा सन्मान असल्याची भावना श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे सन्माननीय कोषाध्यक्ष मा. श्री. दिलीपबाबू इंगोले यांनी व्यक्त केली. प्राचार्य डॉ. जी. व्ही. कोरपे यांनी महाविद्यालयाच्या सर्व माजी प्राचार्यांचे व शिक्षकांचे महत्वपूर्ण योगदान आणि श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या सन्माननीय कार्यकारी परिषदेचे खंबीर पाठबळ असल्यामुळेच महाविद्यालयाच्या यशाची पताका गगनात झळकत असल्याची भावना व्यक्त केली.

विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी राबविलेल्या योजना आणि नियमित कार्यक्रमांचे वार्षिक नियोजन हेच या यशाचा मुख्य आधार आहे. एनआयआरएफ रँकिंगमध्ये महाविद्यालयात सुरु केलेले नाविन्यपूर्ण उपक्रम, पर्यावरणपूरक वातावरण, विद्यार्थ्यांच्या उद्योजकीय कौशल्य विकासावर दिलेला भर, संशोधन कार्य व उद्योग स्थापनेसाठी करण्यात येत असलेली आर्थिक मदत, अर्न अँड लर्न योजना, आणि विद्यार्थी व कर्मचारी कल्याणकारी योजना या सारख्या मूलभूत मुद्द्यांवर उचललेली पावले अत्यंत महत्वाची ठरली आहेत. **– डॉ. प्रमोद पडोळे,** एनआयआरएफ समिती समन्वयक

महाविद्यालयातील विद्यार्थी केंद्रित उपक्रम, सहकाऱ्यांचे निरंतर परिश्रम आणि शिस्तबद्ध वातावरणामुळेच हा सन्मान प्राप्त करू शकलो. श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे भक्कम पाठबळ, भूतपूर्व प्राचार्यांनी रचलेला मजबूत पाया, तसेच प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या निस्वार्थ सेवेने हे यश शक्य झाले आहे. आय.क्यू.ए.सी.चे सातत्यपूर्ण कार्य पाहता या यशाची खात्री होती. **– प्राचार्य डॉ. जी. व्ही. कोरपे**

श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय संस्थेचा आभिमान आहे. इतर महाविद्यालयांच्या गुणवत्ता वाढीसाठी विशेष अभियान या महाविद्यालयाने हाती घेतले असून या माध्यमातून संस्थेची इतर महाविद्यालये देखील आगामी काळात अशी यशाची अनेक शिखरे पादाक्रांत करतील. महाविद्यालयाला प्राप्त हे स्थान म्हणजे प्रत्येक घटकाच्या गुणवत्ताधिष्टीत कार्याची पावतीच आहे – **हर्षवर्धनजी देशमुख,** अध्यक्ष, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती

## विभागीय आयुक्त डॉ. निधी पांडेय शुक्रवारी घेणार मतदार यादीचा आढावा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १३अकोला –** छायाचित्र मतदार यादीच्या विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमात मतदार यादी निरीक्षक म्हणून विभागीय आयुक्त डॉ. निधी पांडेय यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यानुसार त्या शुक्रवार, दि. १६ ऑगस्ट रोजी मतदार यादी विषयक कामांचा आढावा घेणार आहेत.

मतदार यादी निरीक्षकांच्या उपस्थितीत जिल्ह्यातील सर्व संसद सदस्य, विधानसभा सदस्य व राजकीय पक्षांचे प्रतिनिधी यांच्यासमवेत बैठक शुक्रवारी सकाळी १० वा. जिल्हाधिकारी कार्यालयातील लोकशाही सभागृहात होईल.

मतदार यादीतील नोंदणी बाबत आक्षेप व इतर तक्रारींच्या अनुषंगाने यावेळी चर्चा होईल. मतदार यादीतील नोंदीबाबत आक्षेप, सुचना असल्यास उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी केले आहे.



## १७९ सरळसेवा आरएफओंच्या पदोन्नतीला स्थगिती देण्यास 'सर्वोच्च' नकार

### वन विभागाचे मात्र 'वेट न्ड वॉच'

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती–** राज्य वनसेवेत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून नियुक्ती झालेल्या वनपरिक्षेत्र अधिकारी (आरएफओ) यांना पदोन्नती देताना प्रशिक्षण कालावधी ग्राह्य धरण्यात यावा, असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने नुकताच दिला आहे.



मात्र उच्च न्यायालयाच्या या निर्णयाविरुद्ध पदावनत आरएफओंनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. तथापि सरळसेवा आरएफओंच्या पदोन्नतीला स्थगिती देण्यास सादर याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला आहे. असे असताना वन विभागाकडून सरळसेवा आरएफओंच्या पदोन्नतीसाठी कोणत्याही हालचाली होताना दिसून येत नाहीत. केवळ 'वेट न्ड वॉच' अशी वरिष्ठांची भूमिका आहे.

सर्वोच्च न्यायालयात २ ऑगस्ट २०२४ रोजी याचिका क्रमांक ३५४२८/२०२४ अन्वये निलय भोगे विरुद्ध महाराष्ट्र राज्य यावर १२ ऑगस्ट रोजी सुनावणी करताना न्या. अभय एस. ओका, न्या. ऑगिस्टन जॉर्ज मशिह यांनी सरळसेवा आरएफओंच्या पदोन्नतीला स्थगिती देण्यास नकार देण्यात आला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर १७९ सरळसेवा आरएफओंना पदोन्नती देणे हे क्रमप्राप्त आहे. मात्र वन विभागातील वरिष्ठ आरएफओंच्या पदोन्नती फाइलकडे दुर्लक्ष करीत असल्याची खात्रीलायक माहिती आहे. विधानसभा निवडणूक आचारसंहितेपूर्वी सरळसेवा आरएफओंना पदोन्नती मिळाली नाही तर पुन्हा नागपूर येथे वन बल भवनाच्या येरझारा मारण्यात आरएफओंना वेळ घालावा लागणार आहे. यासंदर्भात राजाच्या वन बलप्रमुख शोमिता बिश्वास यांच्याशी संपर्क साधला असता त्या उपलब्ध झाल्या नाहीत.यापूर्वी उच्च न्यायालयाने केवळ ३ याचिकाकर्त्यांसाठी संपूर्ण पदोन्नती प्रक्रियेवर स्थगिती देणे शक्य नसल्याचे निरीक्षण नोंदवून याचिकाकर्ते यांच्यासाठी केवळ ३ जागा पुढील चार आठवड्यांसाठी स्थगित ठेवून पदोन्नती प्रक्रिया राबविण्याबाबत शासनाला निर्देश दिले होते. त्याअनुषंगाने वन विभागाने सरळसेवा आरएफओंना सहायक वनसंरक्षकांच्या रिक्त पदांवर पदोन्नती देण्यासाठी शुक्रवार ९ ऑगस्ट २०२४ रोजी नागरी सेवा मंडळाची बैठक घेतली. परंतु या बैठकीत १७९ आरएफओंच्या यादीवर कोणताही निर्णय झाला नाही.

### सहायक वन संरक्षकांची पदे रिक्त, नियमित कामकाज प्रभावित

'मॅट' न्यायालय, उच्च न्यायालय, आता सर्वोच्च न्यायालयानेही सरळसेवा आरएफओंच्या बढतीचा मार्ग सुकर केला आहे. आरएफओंच्या पदोन्नतीची यादीदेखील तयार आहे. मात्र वन खात्यातील वरिष्ठांची याबाबत उदासीनता दिसून येते. किंबहुना पदोन्नती कशी थांबेल, यासाठी पडद्यामागील जोरदार हालचाली होत असल्याची विश्वसनीय माहिती आहे. तर सहायक वनसंरक्षकांची शेकडो पदे रिक्त असल्यामुळे वन विभागात नियमित कामकाजावर परिणाम होत आहे.

## महायुतीचा पश्चिम विदर्भात २५ जागांचा संकल्प

### लोकसभेची उणीव विधानसभेत भरून काढू



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती**

लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रामध्ये महायुतीला फारसे यश आले नाही. त्याचे मुख्य कारण नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या संवादाचा अभाव होते. तो संवाद निरंतर व्हावा व विधानसभा निवडणुकीत लोकसभेची उणीव भरून काढत किमान २५ जागा जिंकण्याचा संकल्प मंगळवारी महायुती समन्वय समितीच्या बैठकीत करण्यात आला.

संत ज्ञानेश्वर सांस्कृती भवनात झालेल्या विभागीय बैठकीला केंद्रीय मंत्री प्रताप जाधव, उद्योगमंत्री उदय सामंत, महायुतीचे समन्वयक प्रसाद लाड, संजय कुंटे खा.अनुप धोत्रे, चैनसुख संचेती, आ. रणधीर सावरकर, आ. श्वेता म्हाले, आ. अनिकेत तटकरे, प्रवीण पोटे, आ. योगेश टिळेकर, आ. अमोल मिटकरी, आ. देवेंद्र भुयार, अभिजित अडसुळ, केवलराम काळे, निवेदीता चौधरी, शिवसेना जिल्हाध्यक्ष प्रवीण पडोळे, सुरेखा ठाकरे, जयंत डेहनकर, तुकाराम बिडकर, प्रविण दिधाते यांच्यासह तीन्ही पक्षाचे पदाधिकारी व्यासपीठावर होते. लोकसभा निवडणुकीच्या पृष्ठभूमिवर भाजपा, राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेना शिंदे गटाची महायुती समन्वय समिती गठीत करण्यात आली आहे.

समितीच्या वतीने राज्यातील २८८ विधानसभा मतदारसंघात २० ऑगस्ट ते ४ सप्टेंबर दरम्यान कार्यकर्ता संवाद सभेचे आयोजन होत आहे. त्या अनुषंगाने पश्चिम विदर्भ समन्वय समितीची बैठक पार पडली. प्रस्ताविकातून समन्वय समितीचे सदस्य संजय खोडके यांनी बैठकीच्या आयोजनाबाबत माहीती दिली. प्रमुख नेत्यांचे बैठकीत मागदर्शन झाले. विभागस्तरावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार या तिन्ही प्रमुख नेत्यांच्या उपस्थिती एका महासभेचे नियोजन देखील बैठकी दरम्यान करण्यात आले. बैठकीला पाचही जिल्ह्यातील भाजपा, शिवसेना व राष्ट्रवादी पक्षाचे प्रमुख कार्यकर्ते हजर होते.

### अपप्रचाराला प्रतिउत्तर द्या : सामंत

लोकसभा निवडणुकीत विरोधकांनी केलेल्या अपप्रचारामुळेच महायुतीला कमी जागा मिळाल्या. अलीकडे देखील लाडकी बहिण व लाडका भाऊ योजनेचा अपप्रचार सुरू आहे. त्यामुळे त्यांना याचे उत्तर देण्याकरीताच ही संवाद सभा असून शासकीय योजनांची माहीती महायुतीचे कार्यकर्ते म्हणून स्वता: द्या आणि त्यांच्या अपप्रचाराला बळी न पडता त्यांना त्याच शब्दात उत्तर द्या, अशी सूचना उद्योगमंत्री उदय सामंत यांनी केली.

### यांची अनुपस्थिती चर्चेची

महायुती समन्वय समितीच्या बैठकीला भाजपाचे जिल्हाध्यक्ष खा. अनिल बोंडे, माजी खासदार नवनित राणा, आ. प्रताप अडसड यांची अनुपस्थिती दिसून आली. महायुतीचे घटक असलेले युवा स्वाभिमान पक्षाचे आ. रवि राणा बैठकीत नव्हते. विभागतील तीन्ही पक्षांचे आजी,माजी खासदार, आमदार उपस्थित असताना या चौघांच्या अनुपस्थितीची चर्चा सुरू होती.

## तिवसा शहरात दहावी व बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा

विदर्भ प्रजासत्ताक **दि.१४ तिवसा–** तिवसा विधानसभा मतदारसंघातील, व मोर्शी तालुक्यातील, दहावी व बारावीच्या परीक्षेत गुण मिळवुन उंतीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थी व विद्यार्थीनी यांचा गुनगौरव सन्मान व सत्कार सोहळा तिवसा विधानसभा निवडणुक प्रमुख तथा महाराष्ट्र प्रदेश कार्यकारीणी सदस्य, राजेश वानखडे, यांच्या संयुक्त विद्यमाने तिवसा शहरातील समर्थ लॉन पंचवटी चौक येथे हा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला आहे.विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वाटचालीस इयत्ता दहावी व बारावी, या वर्गात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या भावी आयुष्यातील वाटा व नवीन दिशा मिळत असतात अश्यावेळी योग्य वयात मिळवीलेले यश व योग्य मार्गदर्शन यामुळे विद्यार्थ्यांना मिळालेल्या यशाचे कौतुक होणे गरजेचे आहे म्हणूनचदिनांक १७,आगष्ट रोजी दुपारी ठीक ११ वाजता या सोहळ्यास सुरुवात होणार असून यावेळी राज्यसभा खासदार तथा भाजप जिल्हाध्यक्ष अनिल बोडे, उपेंद्रजी कोठेकर,महामंत्री भाजप, माजी खासदार, नवनीत राणा, मा. आ.साहेबराव तट्टे, भाजप प्रवक्ते शिवराय कुळकर्णी, दिनेश सुर्यवंशी, नितीन गुडधे, विवेक गुल्हाने, यांच्या प्रमुख उपस्थितीत विद्यार्थी गुणगौरव सोहळा सम्पन्न होणार असून उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र शाल व श्रीफळ देऊन गौरविण्यात येणार आहे. सदर उपक्रमात जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभागी होण्याचे आवाहन आयोजक तिवसा विधानसभा प्रमुख महाराष्ट्र प्रदेश कार्यकारणी सदस्य राजेश वानखडे, यांच्या वतीने करण्यात आले आहे..

## युवकांवर स्पर्धा परीक्षेच्या अभ्यासासाठी जागा शोधण्याची वेळ

### 33 कर्मचाऱ्यांनी गमावल्या नोकऱ्या; शिक्षण, रोजगाराच्या संधी हिरावल्या

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती–** अमरावती मागील दोन वर्षात अमरावती जिल्ह्यातील ११२ ग्रंथालये बंद झाली आहेत. त्यामुळे ३३ ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांना आपल्या नोकऱ्या गमवाव्या लागल्या असून यावर आधारित तरुणाईच्या शिक्षण आणि भविष्यातील रोजगाराच्या संधी हिरावल्या गेल्या आहेत. शासनाने पहिल्या टप्प्यात जिल्ह्यातील ४५ तर दुसऱ्या टप्प्यात ६७ ग्रंथालये बंद केली. ही ग्रंथालये बंद होण्यापूर्वी दररोज त्या ठिकाणी प्रत्येकी ५० ते ६० याप्रमाणे जवळपास ६ हजारांवर तरुण-तरुणी स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करीत होते. एवढेच नव्हे तर शंभरावर सामान्य वाचक वृत्तपत्रे, ग्रंथ, पाक्षिके आणि मासिके या माध्यमातून वाचनाची भूक भागवित होते. मात्र ग्रंथालये बंद झाल्याने या सर्व बाबींना आता ब्रेक लागला आहे. बंद झालेली बहुतेक ग्रंथालये 'क' आणि 'ड' वर्गातील आहेत. नगरपंचायती आणि ग्रामपंचायती असलेल्या गावांमध्ये ती होती. परंतु व्यवस्थित चालत नसल्याने ती अकार्यक्षम ठरली. त्यामुळे ती बंद करण्यात आली, असे ग्रंथालय प्रशासनाचे म्हणणे आहे. मात्र ग्रंथालये बंद झाल्याने ३३ कर्मचाऱ्यांना आपले रोजगाराचे साधन गमवावे लागले. ग्रंथालय चालवणाऱ्या संस्थांनी अंशकालीन सेवेकरी म्हणून त्यांच्यावर ही जबाबदारी सोपविली होती. त्यासाठी शासनाने ठरवून दिल्यानुसार त्यांना तुटपुंजे मानधन दिले जात होते. परंतु आता त्या मानधनापासूनही ते वंचित झाले आहेत. तुटपुंजी मिळकतही गेली फ्रेजरपुरा येथील समता सार्वजनिक वाचनालयात अंशकालीन ग्रंथपाल म्हणून कार्यरत होतो. महिन्याला बाराशे ते पंधराशे रुपये मिळायचे. मात्र ग्रंथालयच बंद झाल्याने ती तुटपुंजी मिळकतही गमावली गेल्याचे प्रशिक मोहोड, अमरावती या ग्रंथपालाने म्हटले आहे. लोकप्रतिनिधींनी पुढाकार घेण्याची आवश्यकता : शासनाने ग्रंथालय चळवळीसाठी ठोस उपाययोजना करणे गरजेचे आहे. दर्जावाढ व अनुदानवाढ यावर गंभीरतेने विचार होणे गरजेचे आहे. यासाठी लोकप्रतिनिधींनी पुढाकार घ्यावा, अशी ग्रंथालय संघाची मागणी आहे. ग्रंथालयांमध्ये आता अशी गर्दी केव्हा दिसून येईल, असा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होतो आहे.

### बाब चिंताजनक; पण पुनरुज्जीवनासाठी प्रयत्न

सात टक्के ग्रंथालये बंद होणे ही निश्चितच चिंताजनक बाब आहे. त्यामुळे ग्रंथ चळवळ विकसित होणे आवश्यक आहे. बंद झालेल्या ग्रंथालयांची मंडळी पुढे आल्यास त्यांच्या पुनरुज्जीवनासाठी आम्ही पुढाकार घेऊ.

**दीपिका खांडेकर,** अध्यक्ष, अंबादेवी ग्रंथालय, अमरावती.



# १५ ऑगस्टला जिल्ह्यातील प्रगतशील शेतकरी महिलेला दिल्लीचे आमंत्रण

## महाराष्ट्रातील १६ प्रगत शेतकऱ्यांचा होणार सन्मान : कृषी विज्ञान केंद्र घातखेडच्या मार्गदर्शनात ममताताईंची प्रेरणादायी वाटचाल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४अमरावती**

एका गृहीणी करीता तीचे घर हेच विश्व असते. जेव्हा या गृहीणीला कर्तृत्व सिद्ध करण्याची संधी मिळते तेव्हा तीची वाटचाल केवळ घरापर्यंत मर्यादीत न राहता समाजाकरीता एक प्रेरणादायी ठरत असते. ही यशोगाथा आहे, अमरावती जिल्ह्यातील चांदुर रेल्वे तालुक्यातील कारला येथील प्रगत महिला शेतकरी ममताताई ठाकुर यांची. ग्रामीण भागातील एक गृहीणी, घर आणि शेती ची जबाबदारी सांभाळतांना पारंपारीक शेतीला फाटा देत स्वत:च्या हिमतीवर प्रगत शेती करण्याचा यशस्वी संकल्प ममताताईंची साधला. या संकल्पपूर्ती करीता साथ मिळाली ती श्रमसाफल्य फाऊंडेशनद्वारा संचालित कृषी विज्ञान केंद्र घातखेड ची. विज्ञान केंद्र घातखेड च्या सहकार्य व मार्गदर्शनाखाली ममताताईंनी आपल्या पारंपारीक शेतीला शेतीपूरक उद्योगाचे स्वरूप दिले. एवढेच नव्हे तर नैराश्यात असलेल्या महिला शेतकऱ्यांना मार्गदर्शन, सहकार्य करीत ममताताईंनी ग्रामीण महिला शेतकऱ्यांमध्ये नवी उमेद निर्माण केली. ममताताई ठाकुर या कार्याची दखल घेत त्यांना नुकताच २०२२ चा जिजामाता कृषी भूषण राज्य पुरस्काराने नुकताच सन्मानित करण्यात आले असून आज १५ ऑगस्ट २०२४ रोजी दिल्ली येथे होत असलेल्या देशाच्या स्वातंत्र्याचा ७८ व्या वर्धापण दिनी अमरावती जिल्ह्यातून एकमेव कारला येथील प्रगत महिला शेतकरी ममता ठाकुर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

१६ वर्षांपूर्वी सामान्य गृहिणी म्हणून जिवन जगणाऱ्या ममताताईंच्या व्यक्तीमत्वाला कृषी विज्ञान केंद्र घातखेड ने एक सक्षम व्यासपीठ दिले. विज्ञान केंद्र गृहविज्ञान विभागाच्या विशेषज्ञ डॉ. प्रणिता कडू यांनी कारला गाव दत्तक घेतले, महिला सक्षमीकरणासाठी आवश्यक असलेले विविध प्रशिक्षणे, अभ्यास दौरे, शेतीशाळा, कृषी प्रदर्शनी व प्रात्याक्षिकांचे आयोजन करण्यात येत होते. यावेळी प्रत्येक कार्यक्रमामध्ये ममताताई उपस्थित राहून वेळोवेळी लाभ घेत होत्या. या कृषी ज्ञानाद्वारे त्यांनी स्वतःच्या शेतीमध्ये व शेतीपूरक उद्योगामध्ये विशेष बदल करून प्रेरणादायी उपक्रम राबविले. ज्यामध्ये सेंद्रीय शेतीसाठी लागणाऱ्या विविध निविष्ठा निर्मिती ज्यामध्ये निंबोळी अर्क, जीवामृत, दशपर्णी, बी.डी कंपोस्ट, हिरवळीचे खत, गांडूळ खत, पोषण परसबाग निर्मिती, कृषी विज्ञान केंद्र घातखेड द्वारे प्राप्त शिलाई मशीन व प्रशिक्षणातून कापूस वेचणी कोट ची निर्मिती करून प्रसार व प्रचार करणे, आवळा कँडी व सरबत निर्मिती, सोयाबीन पासून मूल्यवर्धीत पदार्थ, शेतातून निघणाऱ्या सेंद्रीय उत्पादनापासून उदा. डाळी निर्मिती, हळद, धने, मिर्ची पावडर तयार करणे, गव्हापासून विविध पदार्थ तयार करणे, मालाची स्थानिक पातळीपासून तर राज्यपातळी पर्यंत विक्री करून कृषीउत्पन्न दुप्पट करण्याचे विविध मार्ग अवलंबिले. याकरीता कृषी विज्ञान केंद्र घातखेड ची त्यांना वेळोवेळी मदत मिळत होती.

कोरडवाहू अल्पभूधारक शेती फायद्यात आणण्यासाठी अत्यंत कष्ट व मेहनतीच्या भरवशावर सेंद्रीय निविष्ठाचा सातत्याने वापर करून जमिनीचे आरोग्य व पोत सुधारून





शेतीवरचा खर्च कमी केला व सातत्याने कृषी विज्ञान केंद्राच्या संपर्कात राहून येथील तज्ञ मंडळीने शेतीमध्ये सांगितलेले नवनवीन प्रयोग करून शेतीमधे नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करीत गेल्या. त्यातून आज संयुक्त कुटुंबातील खर्च पूर्ण करून मुलांचे शिक्षणही यशस्वीरित्या सुरू आहे. विशेष म्हणजे, कृषी विज्ञान केंद्र घातखेड, अमरावती द्वारे मिळालेल्या पोषण परसबाग बियाणे व लिंबु,शेवगा झाडाचे यशस्वी संगोपन करून त्याला आलेल्या फळाची विक्री आपल्या मतिमंद व दिव्यांग तरुण मुलाचा आत्मविश्वासाला बळ दिले. गावास्तरावरून विक्रीच्या माध्यमातून मुलाचे आर्थिक सक्षमीकरण केले. ममताताईंच्या या प्रेरणादायी उपक्रमांना कारला ग्रामस्थांनी भरभरून प्रतिसाद दिला. गावातील व संपूर्ण तालुक्यातील सर्व महिलांना गटाच्या माध्यमातून संघटीत करून कृषी विज्ञान केंद्र घातखेड च्या मार्गदर्शनाखाली शेतकरी महिलांमध्ये नवी उमेद निर्माण करीता उत्पादक कंपनीची स्थापना यशस्वीरित्या करण्यात आली. आज याचे फलीत म्हणजे विविध स्तरातून सन्मान, वेगवेगळे पुरस्कार व विविध समित्यावर सदस्य म्हणून यशस्वी वाटचाल करीत आहे.कृषी विज्ञान केंद्र घातखेड च्या मार्गदर्शनाखाली ममताताई ठाकुर यांनी साधलेल्या यशस्वी वाटचालीमध्ये जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, उमेद, कृषी विभाग, डॉ. पंजाबराव देशमुख जैविक मिशन, चेतना ऑरगॅनिक यांचे वेळोवेळी मिळालेले सहकार्य मिळत गेले. या यशस्वी प्रगत शेतकरी महिला ममताताईंच्या कर्तृत्वाची प्रेरणा संबंध समाज व शेतकऱ्यांना मिळाली याकरीता कृषी विज्ञान केंद्र गृह विज्ञान विभागाद्वारे महाराष्ट्र शासनाच्या जिजामाता कृषीभुषण पुरस्कारासाठी नामांकन पाठविण्यात आले होते. ज्याची दखल महाराष्ट्र शासनाने घेत ममताताईंना २ लक्ष रूपयांचा २०२२ राज्यस्तरीय पुरस्काराने नुकताच सन्मानित करण्यात आले. आता याच पुरस्काराची दाखल घेत केंद्र शाशनाने १५ ऑगस्ट रोजी दिल्ली येथे होत असलेल्या ७८ व्या वर्धापन दिनी ममता ठाकूर यांना प्रमुख अतिथी म्हणून आमंत्रित केले आहे. ही बाब अमरावतीकरांसह समस्त शेतकरी बांधवांकरिता प्रेरणादायी ठरली आहे.

# स्वातंत्रदिनानिमित्त मध्यरेल्वे नागपूर कोल्हापूरसाठी सोडणार विशेष गाड्या!

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४अमरावती**



स्वातंत्र्यदिनापासून सलग सुट्यांमुळे बाहेर जाण्याच्या विचारात असलेल्या प्रवाशांच्या सोयीसाठी मध्य रेल्वे प्रशासनाने १४ स्पेशल ट्रेन चालवण्याचा निर्णय घेतला आहे. ९ मुंबई ते ९ नागपूर आणि कोल्हापूरपर्यंत ही सुविधा असल्याने या मार्गावरील प्रवाशांना मोठा दिलासा आहे. मात्र, या सुविधेसाठी प्रवाशांना जादा पैसे मोजावे लागणार आहेत.

०२१३० एलटीटी-नागपूर एसी सुपरफास्ट स्पेशल ट्रेन गुरुवार १५ ऑगस्ट रोजी रात्री १२ वाजून २५ मिनिटांनी सुटून नागपूरला दुपारी साडेतीन वाजता पोहोचणार आहे. परतीकरिता ०२१४० ट्रेन १६ ऑगस्ट रोजी नागपूर येथून दुपारी दीड वाजता निघून एलटीटीला दुसऱ्या दिवशी पहाटे ४ वाजून १० मिनिटांनी येणार आहे. या ट्रेनला ठाणे, कल्याण, इगतपुरी, नाशिक रोड, मनमाड, भुसावळ, मलकापूर, शेगाव, अकोला, मूर्तिजापूर, बडनेरा, धामणगाव आणि वर्धा स्थानकात थांबा दिला आहे.तर ०१४१७ सीएसएमटी-कोल्हापूर स्पेशल ट्रेन २० ऑगस्ट रोजी रात्री १२ वाजून २० मिनिटांनी निघून कोल्हापूरला दुपारी दीड वाजता पोहोचणार आहे. तर ११४१८ ट्रेन १८ ऑगस्ट रोजी रात्री १० वाजता सुटून सीएसएमटीला दुसऱ्या दिवशी दुपारी दीड वाजता येणार आहे. या ट्रेनला कल्याण, लोणावळा, २ पुणे, जेजुरी, लोणंद, सातारा, कराड, किर्लोस्करवाडी, सांगली आणि मिरज स्थानकात थांबा दिला आहे. याशिवाय ०२१४३-४४ पुणे-नागपूर एसी सुपरफास्ट आणि ०६५३३-३४ कलबुर्गी-बेंगळूर दरम्यान स्पेशल ट्रेन चालवण्यात येणार आहे.

# शेतीचा पेरा नोंदणी सुविधा ऑफलाईन करा - दिनकर सुंदरकर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४ अमरावती**

शेतकऱ्यांच्या शेतातील पिकाची नोंद सुलभ व्हावी याकरिता सरकारने ई पीक पाहणी व नोंदणी ऐप जाहीर केला मात्र हा ऐप शेतात चालत नसून अनेक वेळी प्रयत्न करून सुद्धा नोंदणी पूर्ण होत नसल्याने ऑफलाईन पीक पेरा नोंदणी सुविधा उपलब्ध करून द्यावी अशी मागणी दिनकर सुंदरकर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.सरकारी दप्तरी शेताकऱ्यांच्या शेतातील सेटलाईट नोंदणी करून गतिमान सुविधा उपलब्ध व्हावी हा सरकारचा हेतू असला तरी आजही अनेक शेताकऱ्यांकडे स्मार्टफोन नसल्याने त्यांना इतरांवर आधारित राहून नोंदणी करावी लागते मात्र यामुळे अनेक शेतकरी पीक पेरा नोंदणी पासून वंचित राहिले आहे.तर ग्रामीण व दुर्गम भागात स्मार्टफोनला नेटवर्क नसल्याने पीक पेरा नोंदणी प्रलंबित दाखविली जात आहे त्यामुळे अनेक शेतकरी चिंतेत पडले असून ई पीक पाहणी व नोंदणीला पर्याय म्हणून ऑफलाईन नोंदणी सुविधा सरकारने उपलब्ध करून द्यावी अशी मागणी भाजपचे ओबीसी मोर्चा माजी जिल्हा सरचिटणीस दिनकर सुंदरकर यांनी केली आहे.

# ग्रामीण पोलीस दलातील २३ अधिकाऱ्यांचे खांदेपालट

## पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांचे आदेश निर्गमित

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४ अमरावती**


ग्रामीण पोलीस दलातील आठ पोलीस निरीक्षक, सात साहाय्यक पोलीस निरीक्षक व आठ उपनिरीक्षक अशा एकूण २३ अधिकाऱ्यांची बदली करण्यात आली. या संदर्भात पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी सोमवार, १२ ऑगस्ट रोजा आदेश निर्गमित केले.त्यानुसार चांदूर रेल्वेचे पोलीस निरीक्षक गजानन मेहत्रे यांची अचलपूर, अचलपूरचे अजय आकरे यांची चांदूर रेल्वे, नियंत्रण कक्षातील प्रशांत मसराम यांची बीडीडीएस, सुरक्षा शाखेतील श्रीराम लांबाडे यांची सायबर पोलीस ठाणे, सायबर पोलीस ठाण्यातील प्रकाश अहिरे यांची नियंत्रण कक्ष, पोलीस कल्याण शाखेतील संतोष ताले यांची आर्थिक गुन्हे शाखा आणि आर्थिक गुन्हे शाखेतील शिशीर मानकर यांची



नियंत्रण कक्षात बदली करण्यात आली आहे. त्याचवेळी परतवाड्याचे ठाणेदार संदीप चव्हाण यांची अचलपूर वाहतूक शाखेत बदली करण्यात आली आहे.

त्याचप्रमाणे परतवाडा येथील साहाय्यक पोलीस निरीक्षक शिवहरी सरोदे यांची शिरखेड, नियंत्रण कक्षातील युवराज रबडे यांची परतवाडा, शिरखेड येथील राहुल गवई यांची नियंत्रण कक्ष, दत्तापूर येथील श्रीकांत कडू यांची प्रतिबंधक कक्ष (स्थानिक गुन्हे शाखा), नियंत्रण कक्षातील मिलिंदकुमार दवणे यांची दत्तापूर, नियंत्रण कक्षातीलच मनीष दुबे यांची दर्यापूर आणि अंजनगाव सुर्जी येथील प्रणीता कराळे यांची चिखलदरा येथे बदली करण्यात आली आहे.पोलीस उपनिरीक्षक म. तस्लीम शेख गफूर शेख यांची नियंत्रण कक्षातून स्थानिक गुन्हे शाखा, काशिप्रसाद गौतम यांची जिल्हा विशेष शाखा, विशाल राठोड यांची चिखलदरा येथून धारणी, दीपक दळवी यांची धारणीवरुन परतवाडा, विठ्ठल वाणी यांची परतवाडा येथून चिखलदरा, चंद्रकांत बोरसे यांची वरूडवरुन वाहतूक शाखा, अचलपूर, राजश्री चंदापुरे यांची तिवसा येथून नियंत्रण कक्ष आणि राजू चौधरी नियंत्रण कक्ष येथून वाचक, उपविभाग, दर्यापूर येथे बदली करण्यात आली आहे.

# उद्योजक गुणवंत देवपारे यांचा काँग्रेस पक्षात प्रवेश



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४अमरावती**

लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचे बळवंत वानखडे विजयी झाल्यानंतर विधानसभा निवडणूकीसाठी काँग्रेस नवीन व आक्रमक चेहरे पाहत आहे यातच उद्योजक गुणवंत देवपारे यांनी आज अमरावतीच्या काँग्रेस भवनात काँग्रेस प्रभारी रमेश चेन्नीथल्ला,प्रदेशाध्यक्ष नाना पटोले,विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, बाळासाहेब थोरात,खासदार बळवंत वानखडे, यशोमती ठाकूर यांच्या उपस्थित गुणवंत देवपारे यांनी काँग्रेस मध्ये पक्ष प्रवेश घेतला तर गुणवंत देवपारे यांनी २०१४ व २०१९ ची अमरावती लोकसभा निवडणुक लढवली होती मात्र त्यांचा पराभव झाला होता गुणवंत देवपारे हे दर्यापूर विधानसभा निवडणुकीसाठी इच्छुक असून काँग्रेस त्यांना दर्यापूर मध्ये उमेदवारी देऊ शकते.

# अमरावती, बडनेरा रेल्वे स्टेशनवर पेमेंटसाठी क्यूआर कोडची सुविधा

## आता तिकिट घेण्यासाठी रोख बाळगण्याची आवश्यकता नाही

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४ अमरावती**

मॉडेल रेल्वे स्थानक,अमरावती, पिंक रेल्वे स्थानक, नवी अमरावती, बडनेरा रेल्वे स्थानकावर प्रवाशांना क्युआर कोडच्या माध्यमातून आता पेमेंट करता येणार आहे. त्यामुळे आरक्षण तिकिटांसह सामान्य तिकीट खरेदी करताना प्रवाशांना स्वत:कडे रोख रक्कम बाळगण्याची आवश्यकता नाही. केवळ मोबाइल फोन जवळ ठेवावा लागेल.



मध्य रेल्वे भुसावळ विभाग डिजिटल पेमेंट पद्धतींचा वापर करून कॅशलेस व्यवहारांना प्रोत्साहन देत आहे आणि आपल्या प्रवाशांना सुलभ आणि अधिक कार्यक्षम सेवा सुनिश्चित करण्याचा सतत प्रयत्न करत आहे. कॅशलेस व्यवहारांच्या दिशेने पुढे जाताना भुसावळ विभागातील सर्व आरक्षण कार्यालये तसेच अनारक्षित बुकिंग कार्यालयाच्या सर्व काउंटरवर क्यूआर कोड डीव्हाइस स्थापित केले गेले आहेत. रेल्वे प्रवाशांना तिकीट भाडे भरण्यासाठी क्यूआर कोड डिजिटल माध्यमाची सुविधा पुरवली जात आहे. या नव्या उपक्रमाअंतर्गत भुसावळ विभागातील सर्व स्टेशनांवरील आरक्षित व अनारक्षित तिकीट काउंटरवर क्यूआर कोडच्या माध्यमातून रेल्वे तिकिटाचे पेमेंट स्वीकारण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे.

रेल्वे प्रवाशांना तिकिटांचे पेमेंट भरण्यासाठी यूटीएस मोबाइल प, एटीव्हीएम, पीओएस आणि युपीआय यासारख्या डिजिटल पेमेंटच्या विविध पर्यायांचा आधीपासूनच लाभ घेता येत आहे. या प्रकारच्या डिजिटल पेमेंट प्रणालीला अधिक उपयुक्त आणि सुलभ बनवण्याच्या उद्देशाने भुसावळ विभागाने या सुविधेचा विस्तार केला आहे. ही नवीन डिजिटल पेमेंट प्रणाली क्युआर कोडच्या माध्यमातून तिकिटाचे पेमेंट करण्यास प्रवाशांना आता अधिक सोपी होईल. याच्या माध्यमातून कोणताही प्रवासी कोणत्याही अडचणीशिवाय आणि सुलभपणे आपले तिकिटाचे पेमेंट करू शकतो.

हा उपक्रम रेल्वे प्रवाशांना अधिक सुलभ आणि सुगम प्रवासाचा अनुभव देण्यासाठी एक प्रोत्साहन आहे, तसेच याच्या माध्यमातून डिजिटल पेमेंटसाठी सोपे आणि सुरक्षित पर्याय प्रदान केले जात आहेत. भुसावळ विभागाने प्रवाशांना विनंती केली आहे की त्यांनी तिकिटाचे पेमेंट करण्यासाठी डिजिटल पद्धतीने क्युआर कोडचा वापर करावा.

# प्रा. राम मेघे कॉलेज ऑफ इंजीनियरिंग अँड मॅनेजमेंट बडनेरा येथे हर घर तिरंगा उपक्रमांतर्गत विविध स्पर्धेचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४अमरावती**



हर घर तिरंगा अभियाना अंतर्गत प्रा. राम मेघे कॉलेज ऑफ इंजीनियरिंग अँड मॅनेजमेंट बडनेरा महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दिनांक ०९ ऑगस्ट पासुन हर घर तिरंगा सप्ताहाची सुरवात करण्यात आली. या दरम्यान महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचार्यांना तिरंगा झेंड्याचे वाटप करण्यात आले. प्रत्येकांनी आपल्या घरावर तिरंगा लावण्याची विनंती करण्यात आली. संपूर्ण सप्ताहामध्ये महाविद्यालयात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले, त्यामध्ये देशभक्तीपर गीत स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, वकृत्व स्पर्धा, पथनाट्य, रील्स मेकिंग स्पर्धा व पोस्टर मेकिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. दिनांक १३ ऑगस्ट २०२४ रोजी हर घर तिरंगा अभियान अंतर्गत सकाळी ११.०० वाजता महाविद्यालयातून हर घर तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.या प्रसंगी रासेयोचे कार्यक्रम अधिकारी प्रा शुभम कदम यांनी हिरवी झेंडी दाखवत रॅलीला सुरवात झाली. या दरम्यान विद्यार्थ्यांनी सर्व मिळुन देशभक्तीची भावना जागृत करूया, प्रत्येक घरात तिरंगा फडकवू अशा अनेक घोषवाक्य देण्यात आले. शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार यावर्षी सुद्धा मोठ्या प्रमाणात हर घर तिरंगा राबविण्यात येत आहे. हर घर तिरंगा अभियान देश भक्ती व देश आस्था निर्माण करणे होय.स्वतंत्र दिनाच्या रोजी विविध आयोजित स्पर्धांच्या विजेत्या विद्यार्थ्यांना प्राचार्य डॉ. डी. जी. हरकुट यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात येणार आहे.विविध स्पर्धांचे आयोजन रासेयो चे कार्यक्रम अधिकारी प्रा. शुभम कदम, ,सहकारी वर्ग प्रा गायत्री बहिरे, प्रा विजय खंडार , प्रा अपर्णा खैरकार, डॉ. किशोर ढाके, तसेच महाविद्यालयाचे जनसंपर्क प्रमुख डॉ.लोभस घडेकर व श्री. अंकुर मोहोड यांच्या सहभागाने केले. तसेच स्पर्धा सप्ताह पार पाडण्यासाठी रासेयो स्वयंसेवक मंगल जाधव, सोहन टरपे, धनश्री इंगळे,अथर्व हिंगमिरे, ईश्वरी देशमुख, रिया भट्टड, प्रतिक जेउघाले, स्वराज तलोकार, ऐश्वर्या दातीर, विनीत पाटील, समृद्धी सगणे, आदर्श कुर्हेकर व महाविद्यालयातील सर्व रासेयो स्वयंसेवकांनी उत्स्फूर्तपणे सहकार्य केले.

# विभागात २० लाख कापूस, सोयाबीन उत्पादकांना मिळणार अर्थसहाय्य

## मागील वर्षी झालेल्या भावातील तफावतीचे नुकसान भरून काढण्यासाठी योजना

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४ अमरावती**

मागील वर्षीच्या खरीप हंगामात आंतरराष्ट्रीय घडामोडी व अन्य कारणांनी झालेल्या किमतीतील घसरणीमुळे कापूस व सोयाबीनचे झालेले नुकसान भरून काढण्यासाठी शेतकऱ्यांना राज्य शासनाच्या अर्थसहाय्य योजनेंतर्गत १ हजार ते ५ हजार रुपयांपर्यंत मदत दिली जाणार आहे. अमरावती विभागातील सुमारे २० लाख १७ हजार शेतकरी याकरिता पात्र ठरत असून ही मदत मात्र ई-पीकपेरा नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांना मिळणार आहे.

ई-पीक पाहणीवर नोंद केलेल्या सोयाबीन व कापूस उत्पादक शेतकऱ्यांना शासनाच्या अर्थसहाय्य योजनेचा लाभ देण्याचा निर्णय २९ जुलैला घोषित करण्यात आला. गतवर्षी आंतरराष्ट्रीय घडामोडी व अन्य कारणांनी झालेल्या किमतीतील घसरणीमुळे शेतकऱ्यांना नुकसान सहन करावे लागले आहे. शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी खरीप हंगाम २०२३ मध्ये सोयाबीन व कापूस उत्पादक शेतकऱ्यांना दोन हेक्टरच्या मर्यादेत प्रती हेक्टरी पाच हजार रुपये अर्थसहाय्य देण्याचा निर्णय घेण्यात आला. हे अर्थसहाय्य ज्या शेतकऱ्यांना ई-पीक पाहणीत नोंद केली आहे त्यांनाच मिळणार आहे. या शेतकऱ्यांना ०.२० हेक्टर क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्रासाठी सरसकट एक हजार रुपये तर, ०.२० हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रासाठी त्यांच्या क्षेत्रानुसार प्रती हेक्टर पाच हजार रुपये हेक्टरी देण्यात येणार आहे. ही मदत दोन हेक्टरच्या मर्यादेत असणार आहे. अमरावतीविभागातील पाच जिल्ह्यातील १४ लाख १७ हजार ७३८ सोयाबीन उत्पादक व ६ लाख ९ हजार ६९२ कापूस उत्पादक शेतकऱ्यांना मिळणार आहे. यामध्ये वैयक्तिक व सामूहिक अशा दोन्ही प्रकारच्या शेतकऱ्यांच्या समावेश असून त्यांनी संमती पत्र व सामूहिक खातेदारांनी ना हरकत सादर करण्याचे आवाहन विभागीय कृषी सहसंचालक किसन मुळे यांनी केले आहे.

### जिल्हानिहाय पात्र शेतकरी

| जिल्हा | सोयाबीन उत्पादक | कापूस उत्पादक |
|---|---|---|
| बुलडाणा | ४,६९,४७६ | १,६२,५१७ |
| अकोला | २,१३,९०४१ | ८३,०१३ |
| वाशिम | २,९६,४५३ | २०,७८४ |
| अमरावती | १,९५,९०२ | १,४८,९८७ |
| यवतमाळ | २,४२,००९ | ३,०३,२९७ |

# आ. रवी राणा यांच्या प्रतिकात्मक पुतळ्याला घातला बागड्यांचा हार : राजकमल चौकात महिला काँग्रेसचे आंदोलन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१४अमरावती**

लाडकी बहीण योजने संदर्भात आमदार रवी राणा यांनी केलेल्या वक्तव्यानंतर अमरावतीमध्ये महिला काँग्रेस आक्रमक झाली असून आज अमरावतीच्या राजकमल चौकामध्ये आमदार रवी राणा यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करीत, महिला काँग्रेसने काळ्या फिती बांधून आ. रवी राणा विरोधात निषेध आंदोलन केले. यावेळी महिला काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी आ. रवी राणा यांच्या प्रतिकात्मक पुतळ्याला बांगड्याचा हार घालून निषेध केला. काँग्रेसच्या महिला प्रदेशाध्यक्ष संध्या



सव्वालाखे यांच्या नेतृत्वात हे आंदोलन करण्यात आले.निवडणुकीमध्ये तुम्ही आम्हाला साथ द्या नाहीतर पंधराशे रुपये परत घेऊ या रवी राणांच्या वक्तव्यानंतर संपूर्ण राज्यात राजकीय वर्तुळातून पडसाद उंमटू लागले आहे.

# लाडकी बहीण योजनेचे अर्ज भरण्याचे काम रखडणार

## सरपंच, ग्रामसेवक १६ ऑगस्टपासून बेमुदत संपावर : मागण्या मान्य झाल्या नाहीत, तर येत्या २८ ऑगस्ट पासून आझाद मैदानावर धरणे आंदोलन




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४ अमरावती**

गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या मागण्यांसाठी आता सरपंच, ग्रामसेवक आणि ग्रामपंचायत कर्मचारी रस्त्यावर उतरले आहेत. येत्या १६ ऑगस्ट २०२४ पासून सरपंच, ग्रामसेवक, ग्रामपंचायत कर्मचारी, ग्रामरोजगार सेवक, संगणक परिचालक बेमुदत काम बंद आंदोलन करणार आहेत. तसेच जर मागण्या मान्य झाल्या नाहीत, तर येत्या २८ ऑगस्ट २०२४ रोजी मुंबईतील आझाद मैदानावर धरणे आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

अखिल भारतीय सरपंच परिषदेचे अध्यक्ष जयंत पाटील यांनी दिलेल्या माहितीनुसार, सरपंचांना १५ हजार, उपसरपंचाना १० हजार, तर सदस्याला तीन हजार मानधन मिळावे, या प्रमुख मागणीसाठी सरपंच, ग्रामसेवक आणि ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांकडून आंदोलन करण्यात येत आहे. मुख्यमंत्री आणि ग्रामविकास मंत्र्यांकडे याबद्दल वारंवार पाठपुरावा केला जात आहे. मात्र तरीही आमच्या अनेक मागण्यांवर दुर्लक्ष होत आहे. यामुळे आता आंदोलनाशिवाय पर्याय उरलेला नाही, असे जयंत पाटील यांनी म्हटले. तसेच ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांनी संकटमोचक होऊन आमच्या समस्या सोडवाव्यात, अशी मागणी अखिल भारतीय सरपंच परिषदेचे अध्यक्ष जयंत पाटील यांनी केली.

### ग्रामपंचायत घटकांच्या प्रमुख मागण्या

नियमित व सन्मानजनक मानधन, भत्ता मिळावे, सरपंचांना १५ हजार, उपसरपंचाना १० हजार, तर सदस्याला तीन हजार मानधन मिळावे, ग्रामपंचायत संबंधित सर्व घटकांना विमा, पेन्शन, निश्चित वेतन लागू करावे, मुंबईत सरपंच भवनाची स्थापना करावी, ग्रामसेवक व ग्रामविकास अधिकारी पद एकत्रित करून पंचायत विकास अधिकारी म्हणावे, ग्रामरोजगार सेवकाची नेमणूक पूर्णवेळ करून वेतननिश्चिती करावी, संगणक परिचालकांना ग्रामपंचायत कर्मचाऱ्याच्या आकृतिबंधात आणावे, यावर समितीचा अहवाल त्वरित लागू करावा, संगणक परिचालकांच्या भार ग्रामपंचातीऐवजी शासनाने उचलावा, ग्रामपंचायतीना स्वायत्त संस्थेचा अधिकार देऊन विकासकामे करण्याचा अधिकार द्यावा.

### नागरिकांना करावा लागणार अडचणींचा सामना

येत्या १६ ऑगस्ट २०२४ पासून सरपंच, ग्रामसेवक, ग्रामपंचायत कर्मचारी, ग्रामरोजगार सेवक, संगणक परिचालक बेमुदत काम बंद आंदोलन करणार आहेत. या आंदोलनात सुमारे अडीच लाख लोक आंदोलनात सहभागी होणार आहेत. याचा परिणाम राज्यातील २८ हजार ग्रामपंचायतींवर होणार आहे. यामुळे लाडकी बहीण योजना, पीकविमा अर्ज भरण्याचे काम थांबणार आहे. तसेच एकाच वेळी अनेक ग्रामपंचायतींचा कारभार बंद झाल्यास नागरिकांना विविध अडचणींचा सामना करावा लागणार आहे.

# अमेरिका येथून आलेल्या मिस लिली व फॅन्ड्री यांनी केली हिरापूर एक्का प्लांटची पाहणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४हिरापूर**



अमरावती पंचायत समिती तसेच धामणगावच्या उमेद च्या अनुषंगाने वॉटर डॉट ओआरजी व उमेद च्या महिला यांच्यामार्फत हिरापूर येथे अन्नपूर्णा महिला बचत गटामार्फत शुद्ध पाण्याचे एक्का प्लांट ची सुरुवात करण्यात आली .वाटर डॉट एआरजीचे डायरेक्टर तसेच गट विकास अधिकारी माया वानखडे मनोज भुलारी जनरल डायरेक्टर साउथ एरिया ,अभिषेक आनंद असिस्टंट डायरेक्टर, नेहा यादव, करिष्मा गुल्लारी ,रावजी मिश्रा प्रोजेक्ट मॅनेजर व अमेरिका येथून आलेल्या मिस लिली व फॅन्ड्री यांनी अन्नपूर्णा एक्का प्लांट हिरापूर येथे भेट दिली व पाहणी केली. सर्व पाहुण्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन केले व सर्व महिलांना त्यांच्या प्रकल्पाच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. महिला सुद्धा व्यवसायात पुरुषांपेक्षा कमी नसून या छोट्या व्यवसायातून पुढे मोठा व्यवसाय नक्की करतील व आमच्या भारतामध्ये शहरी तसेच ग्रामीण भागात शुद्ध जल नागरिकांना प्राप्त केला जाते असे अमेरिका येथून आलेल्या मिस लिली यांना गट विकास अधिकारी माया वानखडे पंचायत समिती धामणगाव रेल्वे यांनी प्रतिक्रिया दिली. रूपाली पवन जोशी व सौ मिरचापुरे या दुचाकी वाहनावर पाण्याच्या कॅन ग्राहकांना पुरवतात. त्याबद्दल त्यांचे सर्व पाहुण्यांनी पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला .सोबतच उज्वला सचिन बनकर ,मेघा चौधरी व हिरापूर येथील सर्व महिलांचे सुद्धा यावेळी सर्व पाहुण्यांनी कौतुक व अभिनंदन केले. अमेरिका येथून आलेल्या मिस लिली व फॅन्ड्री यांच ए एस न्यूज महाराष्ट्र चे पत्रकार संतोष वाघमारे तसेच माया जाधव गटविकास अधिकारी पंचायत समिती धामणगाव रेल्वे यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

# अप्पर वर्धा धरणाच्या सांडव्यावर लेझरच्या माध्यमातून तिरंगी प्रकाशझोत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४मोर्शी**



स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर अमरावती शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या मोर्शी तालुक्यातील अप्पर वर्धा धरण तिरंगा रोषणाईनं उजळून निघालंय. धरणाच्या सांडव्यावर लेझरच्या माध्यमातून तिरंगी प्रकाशझोत टाकण्यात आला आहे. धरणातील या तिरंगी जलधारा पाहण्यासाठी मंगळवारी रात्री परिसरातील पर्यटकांची गर्दी उसळली.

अप्पर वर्धा धरणाचे १३ पैकी ११ दारं उघडताच त्यातून मोठ्या प्रमाणात होणारा पाण्याचा विसर्ग मनमोहक असून मंगळवारी रात्री या पाण्यावर राष्ट्रध्वजातील तिन्ही रंग प्रकाश योजनेद्वारे भरण्यात आले. या रंगसंगतीमुळे हे पाणी जणू राष्ट्रध्वज भासत होतं. यामुळे आलेल्या पर्यटकांनी 'भारत माता की जय' अशा घोषणा देत जल्लोष केला.साप्ताहिक सुट्टीसह येणाऱ्या सलग सुट्ट्यांमुळे पर्यटक मोठ्या संख्येनं अप्पर वर्धा धरणाचं मोहक दृश्य पाहण्यासाठी परिसरात गर्दी करतील. तसंच रात्रीच्या सुमारास या ठिकाणी करण्यात आलेली रंगसंगती पाहण्यासाठी देखील उशिरापर्यंत या भागात पर्यटकांची गर्दी राहण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी मतदार नोंदणी गतीने करा : विभागीय आयुक्त डॉ. निधी पाण्डेय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील प्रत्येक विधानसभा मतदारसंघात मतदार नोंदणी केली जात आहे. लोकशाहीच्या बळकटीकरणासाठी जिल्हा प्रशासन आणि विविध राजकीय पक्षांनी मतदार साक्षरता व मतदानाचे प्रमाण वाढावे यासाठी योग्य समन्वय साधून अनुषंगीक कामे गतीने पूर्ण करावे, असे आवाहन अमरावती विभाग मतदार यादी निरीक्षक तथा विभागीय आयुक्त डॉ. निधी पाण्डेय यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या महसूल भवनात डॉ. पाण्डेय यांच्या अध्यक्षतेखाली जिल्ह्यातील सहा विधानसभा मतदारसंघाचे सहायक निवडणूक निर्णय अधिकारी व राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक आज झाली. छायाचित्रासहित मतदार यादीचा विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम २०२४ (अहर्ता दिनांक १ जुलै २०२४ वर आधारित) च्या अनुषंगाने आयोजित प्रथम भेट अंतर्गत या बैठकीत आढावा घेण्यात आला. जिल्हाधिकारी सौरभ कटियार, उपायुक्त (महसूल) गजेंद्र बावणे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी शिवाजी शिंदे, सर्व विधासनभा मतदारसंघाचे सहायक निवडणूक निर्णय अधिकारी, मतदार नोंदणी अधिकारी आदी यावेळी उपस्थित होते.

### अमरावती जिल्ह्यातील सहा विधानसभा मतदारसंघाचा आढावा




जिल्हाधिकारी श्री. कटियार यांनी जिल्ह्यात सुरु असलेल्या मतदार नोंदणीबाबत माहिती दिली. जिल्ह्यातील विधानसभा मतदारसंघनिहाय एकूण मतदाराची संख्या, केंद्रनिहाय सुरु असलेली मतदार नोंदणीची सद्यस्थिती, जिल्ह्यात नव्याने तयार झालेले मतदार केंद्र, प्रस्तावित विलीन होणारी मतदान केंद्र तसेच राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांसोबत घेण्यात आलेल्या जानेवारी ते जुलै २०२४ दरम्यान बैठका आदींबाबत त्यांनी माहिती दिली.

डॉ. पाण्डेय यांनी मतदार नोंदणीच्या कामामध्ये राजकीय पक्षांना येत असलेल्या अडचणीं जाणून घेतल्या व त्या दूर करण्यासंदर्भात त्यांनी प्रशासनाला आदेश दिले. राजकीय पक्षांनी मतदार नोंदणी सहाय्यकाची नेमणूक करणे व प्रशासनाच्या समन्वयाने मतदार जागृतीसाठी विविध उपक्रम राबविण्याचे त्यांनी सांगितले.

नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत ज्या मतदार संघांमध्ये कमी मतदान झाले आहे. तिथे मतदार नोंदणी व मतदान जनजागृती व्यापक प्रमाणात करण्याचे निर्देश विभागीय आयुक्त डॉ. पाण्डेय यांनी दिले. अशा क्षेत्रात 'स्वीप' मोहिम प्रभावीपणे राबविण्यात यावी. युवा मतदारांची मतदार म्हणून अधिकाधिक नोंदणी करावी. यासाठी शाळा, महाविद्यालयाच्या ठिकाणी विशेष शिबीराचे आयोजन करण्यात यावे, असेही विभागीय आयुक्तांनी यावेळी सांगितले.दरम्यान, कोणताही पात्र मतदार मतदान यादीत नाव नोंदवावयाचा शिल्लक राहू नये याची सर्वांनी काळजी घ्यावी, असे आवाहन विभागीय आयुक्तांनी केले. भारत निवडणूक आयोगाकडून छायाचित्र मतदार यादीच्या विशेष संक्षिप्त पुनरिक्षणाच्या सुधारित कार्यक्रमानुसार ३० ऑगस्ट २०२४ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

सुधारित कार्यक्रमानुसार ६ ते २० ऑगस्ट २०२४ या कालावधीत नागरिकांकडून दावे व हरकती मागविण्यात आल्या आहेत. यानुसार पात्र नागरिकांनी नवीन मतदार नोंदणी, दुरुस्ती, वगळणी यासाठी विहीत नमुन्यात अर्ज करता येणार आहे. प्राप्त दावे व हरकतींचे २९ ऑगस्ट २०२४ पर्यंत निराकरण करण्यात येणार आहे.

# शिक्षक महासंघाचे अध्यक्ष चंद्रशेखर भोयर यांचे मुख्यमंत्र्यांना निवेदन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४अमरावती**

दिनांक १३ ऑगस्ट २०१४ चा शासन निर्णयात दुरुस्ती करून एक नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त व नंतर शंभर टक्के अनुदान आलेल्या विनाअनुदानित अंशतः अनुदान अशा सर्व कर्मचाऱ्यांना समान न्याय देण्याबाबत मान.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिले निवेदन.

शिक्षक महासंघाचे अध्यक्ष चंद्रशेखर भोयर यांनी निवेदनात म्हंटले आहे की दिनांक १३ ऑगस्ट २०२४ च्या शासन निर्णयानुसार आयुक्त शिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली २००५ पूर्वी नियुक्त जुन्या पेन्शन संदर्भात तपासणी समिती गठीत करण्यात आली.सदर तपासणी समिती केवळ एक नोव्हेंबर २००५ पूर्वी अंशतः अनुदानित व नंतर शंभर टक्के अनुदानावर आलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनाच जुनी पेन्शन योजना सुरू करण्याच्या संदर्भात आहे असे लक्षात येते.

या शासन निर्णयानुसार स्थापन करण्यात आलेली तपासणी समिती चा एक नोव्हेंबर २००५ पूर्वी बिनाअनुदानित व एक नोव्हेंबर पाच नंतर शंभर टक्के अनुदान आलेल्या महाराष्ट्रातील जवळपास १८ ते २०००० कर्मचाऱ्यांना जुन्या पेन्शन पासून दूर ठेवण्याचा व त्यांचा हक्क नाकारण्याचा मानस असल्याचे दिसून येत आहे.तरी या शासन निर्णयात २००५ पूर्वी नियुक्त विनाअनुदानित शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी २००५ नंतर शंभर टक्के अनुदानावर आलेल्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचा उल्लेख करून नवीन सुधारित शासन निर्णय काढण्यात यावा ही विनंती.दिनांक १३ ऑगस्ट २०२४ चा शासन निर्णय नुसार गठीत तपासणी समिती २००५ पूर्वी विनाअनुदानित कर्मचाऱ्यांवर पूर्णपणे अन्यायकारक असल्यामुळे शिक्षक महासंघ महाराष्ट्र राज्य सदर शासन निर्णय व तपासणी समितीचा जाहीर निषेध करत आहे.तरी आपणास माझी नम्र विनंती आहे की सदर शासन निर्णयात दुरुस्ती करून १ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त व नंतर १०० % अनुदान आलेल्या विनाअनुदानित व अंशतः अनुदानित अशा सर्व कर्मचाऱ्यांना समान न्याय द्यावा असे निवेदनात नमूद केले आहे.



# शिरजगाव कसबा गावात पावसाचा कहर : तलाठी कार्यालयात शिरले पाणी; रस्त्यांना देखील नदीचे स्वरूप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४ शिरजगाव कसबा**

दरवर्षी पावसाळ्यात शिरजगाव कसबा गावात रस्त्यावरून मोठ्या प्रमाणात वाहते पाणी आज दुपारी १ वाजताच्या सुमारास शिरजगाव कसबा मध्ये मुसळधार पाऊस कोसळला या पावसामुळे गावातील रस्ताना नदीचे स्वरूप प्राप्त झाले होते रस्ते,नदी, नाले ओसंडून वाहत होते एवढेच नाही तर या पावसामुळे रस्त्यावर उभ्या असलेल्या दुचाकी सुद्धा पाण्यात वाहून गेली.त्यामुळे गावात कायम स्वरुपी उपाय योजना करण्याची मागणी आता ग्रामस्थांनी केली आहे.

# जिल्ह्यातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांसोबत चर्चा करून,त्यांना विश्वासात घेऊन विधानसभा तिकीट वाटप करणार : महाराष्ट्र प्रदेश प्रभारी रमेश चेनीथला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१४ अमरावती**



येत्या विधानसभा निवडणुकीत दिल्ली व मुंबईत बसुन उमेदवारी न वाटप करता राज्यातील ३६ जिल्ह्यातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांसोबत चर्चा करून,त्यांना विश्वासात घेऊन तिकीट वाटप करण्यात येईल असे काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश प्रभारी रमेश चेनीथला यांनी सांगितले.

ते आज अमरावती येथे आगामी विधानसभा निवडणुकीच्या पाश्र्वभूमीवर काँग्रेस पक्षाची आढावा बैठक होत आहे त्या बैठकीत कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी आले असता त्यापूर्वी पत्रकार परिषदेत बोलत होते.

लोकसभा निवडणुकीत इंडिया आघाडीने भारतीय जनता पक्षाच्या अब की बार ४०० पार या घोषणेची पार हवा काढून घेतली.प्रजातंत्रात अशा पोकळ घोषणा चालत नसून देशाच्या संविधानाचे संरक्षण करण्यासाठी जनतेने इंडिया आघाडीला मतदान केले असल्याचे रमेश यांनी सांगितले.

देशात धर्माच्या नावावर समाजात विभाजन करण्याचे काम आजही सुरू असून सांप्रदायिक सद्भावना टिकवण्यासाठी इंडिया आघाडी गठबंधन प्रतिबद्ध आहे असेही त्यांनी सांगितले.

पूर्वी काँग्रेस पक्षात आपापसात मतभेद होते परंतु आता परिस्थिती बघता काँग्रेस कार्यकर्ते पदाधिकारी एक दिलाने काम करत असून राज्यातील महायुतीच्या सरकारला सत्तेवरून हटविण्यासाठी सर्व सज्ज झाले आहेत असे रमेश यांनी सांगितले.

राज्यात शेतकऱ्यांच्या समस्या, महागाई,बेरोजगारी वाढत असून सामान्य माणसाला जिवन जगणे मुश्किल झाले आहे त्यामुळे महायुती सरकार सर्वच आघाड्यांवर अपयशी ठरले आहे अशी टीका यावेळी कॉग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली.विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार,बाळासाहेब थोरात यांनीही राज्य सरकारवर ताशेरे ओढत महाविकास आघाडीचे सरकार येणार असल्याचे मत व्यक्त केले.

पत्रकार परिषदेत काँग्रेस नेते मुकुल वासनिक,अविनाश पांडे, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार,बाळासाहेब थोरात,खासदार बळवंत वानखडे ,आ. ॲड यशोमती ठाकूर,ग्रामीण काँग्रेस अध्यक्ष बबलू देशमुख सह काँग्रेस चे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बांधकाम कामगारांना गृहपयोगी वस्तु संचाचे वितरण शुक्रवारपासून सुरु

## वाटपाच्या ठिकाणी गर्दी न करण्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १४ अमरावती**

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबईमार्फत जिल्ह्यातील नोंदणीकृती सक्रिय(जिवीत) बांधकाम कामगारांना कंपनीमार्फत गृहपयोगी वस्तु संच वितरण शुक्रवार दि. १६ ऑगस्टपासून सुरु करण्यात येत आहे. नोंदणीकृत बांधकाम कामगारांना संच मिळणार असून त्याचे जिल्हा व तालुकास्तरावर येथे वितरण होणार आहे. त्यामुळे बांधकाम कामगारांनी वाटपाच्या ठिकाणी गर्दी करु नये, असे आवाहन जिल्हा कार्यकारी अधिकारी तथा सरकारी कामगार अधिकारी यांनी केले आहे.

जिल्ह्यातील नोंदणीकृती जिवित पात्र बांधकाम कामगारांना गृहपयोगी वस्तु संच वाटप जिल्ह्यातील संबंधित कंपनीकडून जिल्हा व तालुकास्तरावरील नगरपरिषद येथे नियोजन करण्यात आले आहे. गृहपयोगी वस्तु संच नोंदीत जिवित पात्र बांधकाम कामगारांच्या कुटुंबातील एकाच व्यक्तीला देण्यात येणार आहे. सदर बांधकाम कामगारांना व्यवस्थापक मे. मफतलाल इंडस्ट्रीज मुंबई यांचे भ्रमणध्वनी क्रमांक ७२४९४४२७९३, ७५५८६२७९९७, ७५५९४३८३३८ वरून संपर्क साधून जिल्हा व तालुक्यातील नियोजित ठिकाणी ज्या दिनांकास बोलविण्यात येईल, त्यादिवशी सदर ठिकाणी सकाळी १० वाजता स्वत: बांधकाम कामगाराने संबंधित मुळ कागदपत्रासह उपस्थित राहुन सर्व प्रथम बायोमॅट्रीक करून घ्यावे. तद्नंतर गृहपयोगी वस्तु संच प्राप्त करून घ्यावे. दुरध्वनी क्रमांकावरून संपर्क करण्यात येईल, अश्याच कामगारांची गृहपयोगी वस्तु संच वाटप ठिकाणी उपस्थित राहावे. कायदा व सुव्यवस्था अबाधित राहील याची दक्षता घ्यावी. सदर मंडळाची योजना ही निशुल्क असून त्रयस्त व्यक्तिव्दारे आपली दिशाभूल व फसवणूक करण्यात येत असेल तर नजिकच्या पोलीस स्टेशन मध्ये रितसर तक्रार दाखल करावी.